यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला - १९९२

नगरपालिका नगरवाचनालय कऱ्हाड



# यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

923.60954
NAG
G04284

नगरपालिका नगरवाचनालय, कऱ्हाड

# यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

१९९०

Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CALL NO.
ACC. NO.: G04284
DATE: 8/6/2015
G04284

— वर्ष १८ वे —

Y.C.P. 923.60954/NAG
G04284
LIBRARY

□ प्रकाशन –

प्रा. पुष्पा अनंत भावे, मुंबई
यांचे शुभ हस्ते
दिनांक १२ मार्च १९९४

□ प्रकाशन स्थळ –

यशवंतराव चव्हाण स्मृति-सदन
कऱ्हाड नगरपालिका, कऱ्हाड.

□ प्रकाशक –

श्री पांडुरंग दादासाहेब पाटील
अध्यक्ष
कऱ्हाड नगरपालिका, कऱ्हाड ४१५ ११०

□ मुद्रक –

श्री गजानन रामचंद्र गिजरे
४०४-४०५ गुरुवार पेठ, कऱ्हाड

□ मुद्रणस्थळ –

लोकमान्य मुद्रणालय
४०४-४०५ गुरुवार पेठ, कऱ्हाड
फोन : २१५६



मा. यशवंतराव चव्हाण

# मनोगत

स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण यांनी त्यांच्या सुरुवातीच्या आयुष्यात जे जे उपभोगले - पाहिले - अवलोकन केले, ते सर्व सामाजिक प्रश्न त्यांनी अभ्यासपूर्वक व उत्तमरीतीने सोडविले आणि त्यातूनच ते महाराष्ट्राचे खऱ्या अर्थाने शिल्पकार ठरले. ज्या सामाजिक जाणिवेतून त्यांनी हे कार्य तडीस नेले, अशा विषयांचे समाजप्रबोधन होऊन ते विचार नव्या पिढीस मार्गदर्शक ठरावेत, म्हणून ' यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाले ' चा जन्म १९७३ साली झाला. ही व्याख्यानमाला आदरणीय चव्हाणसाहेबांच्या १२ मार्च या जयंतिदिनो जाणीवपूर्वक चालविली जाते आणि गेल्या दोन दशकाहून अधिक वर्षे ती सातत्याने चालविली जात आहे. एकाच विषयावर एकाच वक्त्याची सलग २/३ व्याख्याने प्रतिपाद्य विषय सविस्तर आणि पूर्णतः कथन व्हावा या हेतूने आयोजिली जातात हे एक आणखी या व्याख्यानमालेचे वैशिष्ठ्य आहे. या प्रथेमुळे या व्याख्यानमालेचे व्यासपीठावर थोर विचारवंत, अभ्यासक आणि मर्मज्ञ यांची हजेरी लागली. मौलिक विचारांचे मंथन व कथन झाले. आणि त्यातून ही एक वैचारिक व्याख्यानमाला म्हणून ओळखली जाऊ लागली, याचा आम्हास सार्थ अभिमान वाटतो.

कऱ्हाडच्या जाणत्या रसिकांकडून या वैचारिक व्याख्यानांना आजवर उत्तम प्रतिसाद मिळत राहिलेला आहे, याचा येथे कृतज्ञतेने उल्लेख करणे जरुरीचे आहे. या व्याख्यानांतील विचार ऐकून तसेच सोडून न देता हे अभ्यासनीय विचारधन शब्दबद्ध करावेत अशा मौलिक सूचना जाणकार श्रोत्यांनी केल्या. त्यांचा

साकल्याने विचार झाला आणि अशी निवडक व्याख्याने पुस्तक-रूपाने प्रकाशित करणेची प्रथा पाडली. आजवर अशी ११ पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. या प्रकाशित पुस्तकांपैकी दोन पुस्तके तर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व मुंबई विद्यापीठाने एम. ए. च्या अधिक वाचनासाठी ३ वर्षे नियुक्त केली होती. हे या पुस्तक प्रकाशन कार्यातील सुयश आहे.

सन १९९० साली महाराष्ट्रातील एक अभ्यासक, विचारवंत आणि मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य डॉ. राम जोशी यांनी 'भारतीय राजकारण : अभ्यासाची एक दिशा' या विषयावर दोन व्याख्यानांतून अभ्यासनीय असे विचार मांडले. ते मौलिक विचार पुस्तक रूपाने प्रकाशित करीत असताना सातत्य-पूर्वक वाटचालीचा आणि स्तुत्य उपक्रम कऱ्हाड नगरपालिकेने राबविलेचा आम्हास आनंद वाटतो.

कऱ्हाडच्या मे. लोकमान्य मुद्रणालयाचे अनुभवी मालक आणि वाकबगार कामगारांनी हे पुस्तक वेळेत सुबक अशा रीतीने मुद्रांकित केलेचा उल्लेख करणे उचित आहे.

वैचारिक धनाची ही बारावी ग्रंथनिर्मिती आम्ही स्वर्गीय यशवंतरावजींच्या स्मृतीस प्रगाढ श्रद्धेने विनम्र होवून समर्पण करीत आहोत.

पी. डी. पाटील<br>
अध्यक्ष,<br>
कऱ्हाड नगरपरिषद.

कऱ्हाड<br>
दि. १२ मार्च १९९४

अं

त

रं

ग

नगरपालिका नगरवाचनालय, कऱ्हाड

# यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

१९९०

वर्ष १८ वे

## " भारतीय राजकारण : अभ्यासाची एक दिशा "

प्रतिपादन : प्रा. डॉ. राम जोशी
माजी कुलगुरू, मुंबई विद्यापीठ

दिनांक १३ मार्च १९९० (व्याख्यान पहिले)

दिनांक १४ मार्च १९९० (व्याख्यान दुसरे)



## व्याख्यात्यांचा परिचय

प्रा. डॉ. राम जोशी यांचा जन्म १९२४ साली पडगे, जिल्हा ठाणे येथे झाला. शालेय शिक्षण चिंचणी, अनाथ विद्यार्थी गृह पुणे यांच्यामार्फत, तर महाविद्यालयीन शिक्षण मुंबईच्या रूईया कॉलेज व मुंबई विद्यापीठाच्या अर्थ व राज्यशास्त्र विभागातून पूर्ण झाले. १९४७ ते १९७७ या तीस वर्षांच्या कालावधीत त्यांनी पोद्दार कॉलेज, रामनारायण रूईया कॉलेज, एस. आय. ई. एस. कॉलेज इत्यादि ठिकाणी अध्यापनाचे कार्य केले. तसेच परदेशातील टेक्सास, डेन्व्हर, पेन्सिलव्हेनिया, मिल्स कॉलेज, व्हॅसार कॉलेज, सॅन फ्रॅन्सिस्को या सारख्या अमेरिकेतील नामवंत संस्थेतही अध्यापनाचे कार्य केले.

आपल्या ज्ञानलालसेतून त्यांनी अध्यापनाच्या पवित्र व्यवसायाद्वारे देशात व देशाबाहेर मोठा नावलौकिक संपादन केला. त्याचा परिपाक शैक्षणिक सन्मान त्यांच्याकडे आपणहून चालत आले. उस्मानिया विद्यापीठाची सन्मान्य डी. लिट्. पदवी, टेक्सास विद्यापीठातील विद्यार्थ्यांद्वारे सर्वोत्कृष्ट शिक्षक म्हणून झालेली निवड आणि डेटन, ओहायो येथील इंडिया फौंडेशनतर्फे अमेरिकन विद्यापीठात गांधी विचारांचा प्रसार केल्याबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आले.

साहित्यातील ही त्यांची कामगिरी नजरेत भरण्यासारखी आहे. त्यांनी भारतीय राज्य घटना, काँग्रेस आणि भारतीय राजकारण ( संपादित ग्रंथ) व भारतीय राज्यांतील राजकारण - इंग्रजी लेखकासमवेत केलेले सहलेखन तसेच भारतीय व परदेशातील ख्यातनाम नियतकालिकातून ३० चे वर लेख प्रकाशित केलेले आहेत.

अध्यापन कार्य, लेखन कार्य आणि शैक्षणिक सन्मानांच्यामुळे त्यांना अनेक प्रशासकीय जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागल्या. १९६३ ते ७७ पंधरा वर्षे प्राचार्य व १९७७ ते १९८३ मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून ते ख्यातकीर्त झाले. याशिवाय अनेक शासकीय समित्यांचे सभासदत्व, अमेरिकन इन्स्टिटयूट फॉर इंडियन स्टडीज व अमेरिकन रिसर्च सेंटर इत्यादि संस्थांच्या बोर्ड ऑफ डायरेक्टरचे सभासदत्वही त्यांनी भूषविले.

सामाजिक, राजकीय कार्यातही त्यांचा मोलाचा सहभाग आहे. विद्यार्थीदशेत असताना १९४२ च्या चले जाव आंदोलनात सक्रीय सहभाग घेऊन कारावासही भोगला होता. महाराष्ट्र विधान परिषदेवरही त्यांनी काम केले आहे. डॉ. जोशी हे समाजवादी विचारसरणीचे एक क्रियाशील कार्यकर्ते आहेत.

महाराष्ट्रातील एक थोर साहित्यिक, परखड समाजवादी विचारवंत, राज्यशास्त्राचे गाढे अभ्यासक, व्यासंगी विद्वान आणि ख्यातनाम वक्ते म्हणून ते सर्वांना परिचित आहेत.

**पी. डी. पाटील**
नगराध्यक्ष

पत्ता :
प्रा. **राम जोशी**
९/३, महालक्ष्मी को-ऑप. हौ. सोसायटी,
१२०, मनमाला टँक रोड, माहीम, मुंबई - ४०० ०१६.

‘ मा. यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला ’

# ‘भारतीय राजकारण : अभ्यासाची एक दिशा’

व्याख्यान पहिले

१३ मार्च १९९०

महाराष्ट्राचे थोर नेते श्री. यशवंतराव चव्हाण यांची आज जयंती आहे. म्हणून माझ्या भाषणाची सुरवात त्यांना माझी आदरांजली वाहून मी करीत आहे. आधुनिक महाराष्ट्राचे ते सर्वार्थाने शिल्पकार होते. लोकमान्य टिळकांच्या नंतर जनमानसामध्ये इतके अलौकिक स्थान मिळविलेला दुसरा नेता महाराष्ट्रामध्ये झाला नाही. हे स्थान त्यांनी आपल्या कर्तृत्वानं मिळवलं आणि आपल्या सामाजिक विचारांच्या झेपेमुळे त्यांना ते मिळवता आलं. महाराष्ट्रीय समाजाची जडणघडण आतापर्यंत कशी झाली, तिची शक्तीस्थाने आणि मर्मस्थाने कोणती हे त्यांना माहीत होते. जर लोकहितवादी, फुले, आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा घेऊन महाराष्ट्राला पुढे जायचे असेल तर सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया ही डोळसपणे आणि नेटाने पुढे नेली पाहिजे, वेगाने पुढे नेली पाहिजे आणि या संदर्भात वैचारिक नेतृत्व सबंध महाराष्ट्राला दिले पाहिजे या भूमिकेवरती ते अविचल उभे राहिले. ते एक कुशल प्रशासक तर होतेच. द्वैभाषिक मुंबई राज्याचा प्रयोग यशस्वी करून त्यांनी पं. नेहरू आणि इतर राष्ट्रीय नेत्यांचे मन वळविले आणि एकभाषी मराठी राज्याच्या स्थापनेला त्यांना प्रवृत्त केले, अनुकूल करून घेतले. त्यामध्येही आणि पुढे महाराष्ट्राचा पहिला मुख्यमंत्री म्हणून त्यांचे प्रशासन कौशल्य दिसले. राष्ट्रीय स्तरावरती गेल्यावर तर संरक्षण खांते, अर्थखाते, गृहखाते,

परराष्ट्रसंबंध खाते अशा एकाहून एक जोखमीच्या जबाबदाऱ्या त्यांनी अतिशय तोलाने पेलल्या आणि त्यामध्ये आपले प्रशासकीय कौशल्य आणि आपला पुरोगामी दृष्टिकोन त्यांनी उत्कटपणे भारतीय जनतेला दाखवून दिला.

त्यांच्या वैचारिक वारशाची महाराष्ट्राला आज कधी नव्हे तेवढी गरज आहे अशी माझी धारणा आहे. त्यांच्या वैचारिक वारशाचा एक अविभाज्य भाग म्हणजे महाराष्ट्राने व्यापक राष्ट्रीय संदर्भाचे कधीही विस्मरण होऊ देता कामा नये. महाराष्ट्राचे राजकारण हे जर पुरोगामी दिशेने जायचे असेल तर महाराष्ट्राने राष्ट्रीय संदर्भ सतत आपल्या नजरेसमोर ठेवला पाहिजे. हा त्यांच्या वैचारिक वारशाचा एक अविभाज्य घटक आहे. त्यांनी " सह्याद्रिचे वारे " या व्याख्यान संग्रहामध्ये म्हटले आहे त्याप्रमाणे मुख्यमंत्री म्हणून जरी मला अनेक वेळा महाराष्ट्राचा विचार करावा लागत असला तरी त्या वेळच्या विचारांचा संदर्भ राष्ट्रीय असतो. भारतीय संदर्भामध्ये मी या राज्याचा विचार करतो असे त्यांनी म्हटले आहे. हे सूत्र त्यांनी कधीही नजरेआड होऊ दिले नाही. त्यांचा वारसा सांगणाऱ्यांनीही ते नजरेआड होऊ देता कामा नये आणि महाराष्ट्रातल्या आमजनतेनेही नजरेआड होऊ देता कामा नये, असे या वेळी मला सांगावेसे वाटते. त्याचे विस्मरण होऊ देणार नाही अशी शपथ घेणे आणि त्यानुसार वर्तन करणे हीच खरी त्यांच्या स्मृतीला श्रध्दांजली ठरेल, असेही मला ठामपणे सांगावेसे वाटते. एवढे बोलून मी माझ्या पहिल्या व्याख्यानाला सुरवात करतो आहे.

विषय तुम्हाला माहीतच आहे. " भारतीय राजकारण : अभ्यासाची एक दिशा. " राजकारणाचा अभ्यास शास्त्रीय पध्दतीने करण्याची गरज असते हे माझे पहिलं विधान आहे. एरवी त्याचे यथार्थ ज्ञान होत नाही.

बऱ्याच लोकांना असे वाटते की, रोजचे वर्तमानपत्र वाचले, पहिल्या पानावरच्या प्रामुख्याने राजकीय अशा बातम्या वाचल्या आणि अग्रलेखामध्ये संपादकांनी व्यक्त केलेली मते वाचली की राजकारणाचा अभ्यास झाला. हा राजकारणाचा काहीसा वरपांगी अभ्यास झाला. राजकारणाच्या मागे असलेल्या ज्या प्रेरक आणि कारक शक्ती आहेत त्या काही तात्कालिक असतात आणि काही दीर्घकालीन असतात. समाजामध्ये अनेक दशके, काही वेळेला अनेक शतकेसुध्दा कधी सूक्ष्म अवस्थेमध्ये कधी प्रगट अवस्थेमध्ये, कधी सौम्य तर कधी उग्र रूप धारण करीत या शक्ती वावरत असतात आणि या शक्तींच्या स्वरूपामुळे आणि परस्पर संबंधांमुळे राजकारणाचे विशिष्ट रूप ठरत असते. म्हणून सुरवातीलाच मला आग्रहाने असे मांडायचे आहे की, राजकारण हा गंभीरपणे अभ्यासण्याचा विषय आहे. आपल्याकडे दुर्दैवाने लोकांनी अशी समजूत करून घेतलेली आहे की, शिक्षण आणि राजकारण या दोन विषयांच्यावरती मते देण्याचा प्रत्येकाला हक्क आहे. आता राजकारणात मत देण्याचा हक्क १८ वर्षांच्यावरील सर्वांनाच मिळालेला आहे. त्या कारणाने मला काही त्याचा प्रतिवाद करता येणार नाही. परंतु मत देत असतांना त्याच्यामागे जर सारासार विचार नसेल तर मतदानाऐवजी मतीदान होण्याची भीती असते, आणि ती टाळायची असेल तर राजकारणाचा गंभीरपणे अभ्यास होण्याची गरज आहे.

ज्या प्रमाणे केवळ लढायांची वर्णने आणि महत्त्वाच्या सनांचे आणि तारखांचे स्मरण म्हणजे इतिहास नाही, त्याच प्रमाणे निवडणुकींची रसभरीत वर्णने आणि पुढाऱ्यांच्या आपापसातील स्पर्धेच्या रसभरीत कथा म्हणजे राजकारण नाही. ती राजकारणाला दिलेली फोडणी आहे असे वाटले तर म्हणां. त्याने राजकारणाचा खमंगपणा वाढतो. पण फोडणी

म्हणजे काही सगळा स्वयंपाक नव्हे. त्याचप्रमाणे निवडणुकीच्या वेळी होणाऱ्या अनेक गमतीच्या किंवा रोमहर्षक कथा " युध्दस्य कथा रम्या " असे म्हणतात. निवडणूक हे एक आधुनिक लोकशाही युध्दच असल्याकारणाने त्याच्याही कथा मोठ्या रम्य आणि सुरस असतात. सुरस अरबी कथांनाही मागे टाकतील इतक्या काही काही वेळेला त्या सुरस असतात. परंतु त्या कथा म्हणजे राजकारण असे कुणी म्हणत नाही. काही लोकांना असे वाटते की, राज्य घटनेची कलमे व संविधानाने निर्माण केलेल्या विविध राजकीय संस्थांची संरचना यांचा अभ्यास म्हणजे राजकारण. हा समज देखील चुकीचा आहे. पण हा समज इतका प्रचलित आहे, इतका रूढ झालेला आहे की, भारतामधल्या अनेक विद्यापीठांच्या राज्यशास्त्राच्या अभ्यासक्रमाकडे नजर टाकली तर तिथे प्रामुख्याने हाच दृष्टिकोन स्वीकारलेला दिसतो की, जणू काही राजकारण म्हणजे संविधानाचा अभ्यास, संविधानानं निर्माण केलेल्या विविध राजकीय संस्थांचा अभ्यास आणि तो अभ्यासही प्रामुख्याने त्यांच्या कार्याबद्दल नसून त्यांच्या संरचनेबद्दलचा किंवा बाह्य सांगाड्याबद्दलचा अभ्यास. हा समजही चुकीचा आहे. पण हा समज युरोपमधून जो राज्यशास्त्राचा अभ्यास ५०-६० वर्षापूर्वी भारतीय विद्यापीठांमध्ये आला त्याचा वारसा आहे. पण दुसऱ्या महायुध्दानंतर युरोपियन किंवा अमेरिकन विद्यापीठांमध्ये राज्यशास्त्राकडे पाहण्याचा आणि त्याचा शास्त्रीय अभ्यास करण्याचा दृष्टिकोन मूलतः बदललेला आहे, त्याची पुरेशी दखल भारतामध्ये उच्च शिक्षण क्षेत्राने अद्यापही घेतलेली नाही.

मी मुंबई विद्यापीठामध्ये या दृष्टीने अभ्यासक्रम अद्ययावत करण्याचा प्रयत्न केला. बोर्ड ऑफ स्टडीजमध्ये जवळजवळ वर्ष / दीड वर्ष मी आणि माझे दोन सहकारी मिळून आम्ही अभ्यासक्रम अद्ययावत करण्याचा

प्रयत्न केला. नव्या संकल्पना अभ्यासक्रमात अंतर्भूत करून तो अद्ययावत केला आणि नवीन पुस्तकांची यादी प्राध्यापकांना आणि मुलांना वाचण्यासाठी प्रसिध्द केली. त्या वेळेला राज्यशास्त्राचे एक प्राध्यापक माझ्याकडे आले, सभेनंतर मला म्हणाले, " प्रो. जोशी, ह्या सगळ्या संकल्पना मला अगदी नवीन आहेत, यातले एकही पुस्तक मी अजूनपर्यंत वाचलेले नाही आणि आता तीनच वर्षे माझ्या नोकरीची उरलेली आहेत. हा सगळा खटाटोप मी करावा असं तुम्हाला वाटतं कां? " मी म्हटलं की, " मला मुळीच वाटत नाही. तीन वर्षे या व्यवसायात राहण्याचा खटाटोपही आपण करण्याची आवश्यकता नाही. पण ती जर करणार असाल तर मग हा अद्ययावत केलेला अभ्यासक्रम जर तुम्हाला काही नवीन अभ्यास करायला लावणार असला तर त्यासाठी मध्यरात्रीपर्यंत दिवा जळत ठेवून अभ्यास करणे क्रमप्राप्त आहे. काय करणार आहात ?" हा जो संरचनात्मक अभ्यासाचा दृष्टिकोन युरोपमधून आला त्याला प्रामुख्याने जर्मन परंपरा कारणीभूत आहे. कारण जर्मन विद्यापीठांमधून राज्यशास्त्राचा स्वतंत्र विषय आणि स्वतंत्र विभाग नसे. तो लॉ ॲन्ड ज्युरिस्प्रुडन्स या विभागांच्या अंतर्गत असे, नाही तर मग राज्यशास्त्राचा विचार राजकीय तत्वज्ञानाच्या संदर्भात होत असे. आदर्श राज्य व्यवस्था कोणती, आदर्श समाजामध्ये राज्यसंस्थेचे स्वरूप काय राहील ? पोलिटिकल सायन्स आणि पोलिटिकल फिलॉसॉफी यांच्यामध्ये भेद केला जात नसे आणि पोलिटिकल फिलॉसॉफीच शिकवली जात असे, पोलिटिकल सायन्समध्ये दोन गोष्टी आल्या. एक मी सांगितले त्याप्रमाणे त्या राजकीय संस्था, त्यांची संरचना आणि त्यांची कार्ये आणि ती कार्ये त्या कशा पार पाडतात याचा अभ्यास, आणि दुसरी राजकारणाची प्रक्रिया म्हणजे पोलिटिकल प्रोसेस. त्यामध्ये राजकीय पक्ष आले, निवडणुका आल्या, बाकीचे जे सगळे प्रक्रियेमध्ये अंतर्भूत करता येईल ते सगळे. अशा दोन अंगांचा

एकत्रित केलेला अभ्यास म्हणजे राज्यशास्त्राचा अभ्यास आहे. असा अभ्यास विशिष्ट समाजाच्या सामाजिक, ऐतिहासिक आणि आर्थिक संदर्भामध्येच होऊ शकतो. राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या शास्त्रीय सुरवातीसाठी प्रथम स्वीकारला पाहिजे असा हा विचार आहे. राजकारणाचे आणि राज्यशास्त्राचे जरी काही वैश्विक नियम असले, जे नियम सर्व मानव समाजांना लागू आहेत असे वाटले तरी ते तितकेसे खरे नाही. कारण राजकारण निर्वात प्रदेशामध्ये घडत नाही.

राजकारण हे विशिष्ट सामाजिक संदर्भामध्ये घडत असते आणि म्हणून सामाजिक संदर्भ जसा जसा बदलत जातो तस तसे राजकारणाचे स्वरूपही बदलत असते. भारतातसुध्दा चाळीस वर्षापूर्वी राजकारणाचे जे स्वरूप होते तसे आज राहिलेले नाही. आपल्या भारतीय समाजामधल्या सगळ्या बऱ्यावाईट गोष्टींचे अधिक ठळक प्रतिबिंब राजकारणामध्ये पडायला लागले आहे. संसदेत आणि विधान सभेत निवडून येणारे लोक, त्यांची वागण्याची पध्दत आणि कार्य पध्दत, संसदेमधल्या आणि विधान सभेमधल्या परिचर्चाचे स्वरूप, राजकीय स्पर्धेचे स्वरूप हे सगळं जे सुशिक्षित आणि विशेषतः पाश्चात्य विद्याविभूषित अशा नेत्यांच्या आणि वर्गाच्या हातामध्ये होते, ते आता हळूहळू समाजातल्या खालच्या वर्गापर्यंत जाऊन तळागाळापर्यंत पोहोचल्याबरोबर तळागाळाला जे जे दिसतं ते ते सगळं आता राजकारणात दिसायला लागले. चांगल्या आणि वाईट दोन्हीही अर्थांनी पण ते अधिक अस्सल भारतीय व्हायला लागले. त्याचा अस्सलपणा फार महत्वाचा आहे आणि एकापरीने त्याच्या या अस्सल भारतीयपणामध्येच त्याच्या पुढचे धोके आणि त्याची शक्ती दोन्हीही सामावलेली आहेत असे मला आग्रहाने सांगायचे आहे. भारतीय राजकारणाचा सखोल अभ्यास करणाऱ्या एका ब्रिटिश राज्यशास्त्रज्ञाने

भारतीय राजकारणावरच्या आपल्या पुस्तकात असे विधान केलेले आहे की, " नो ऑनेस्ट बुक हॅज बीन रिटन ऑन इंडियन पॉलिटिक्स " अजूनपर्यंत भारतीय राजकारणावर प्रामाणिकपणे लिहिलेले पुस्तक नाही. याच्यात त्यांना काय म्हणायचे होते ? त्यांना काही असे म्हणायचे नव्हते की, आतापर्यंत ज्यांनी ज्यांनी लिहिले ते सगळे अप्रामाणिक आहेत, त्यांना म्हणायचे होते की, ही पुस्तके वाचूनसुध्दा भारतीय राजकारणाचे खरे किंवा यथार्थ रूप आपल्याला समजलं असे वाचणाऱ्याला जाणवत नाही. असे का होते याचे उत्तर मी मघाशी जो मुद्दा मांडत होतो त्याच्याशी आहे की, जी पुस्तके भारतीय राजकारणावर लिहिली गेली, भारतीय राज्यशास्त्रज्ञांनी आणि परकीय राज्यशास्त्रज्ञांनी लिहिली त्यांनी प्रामुख्याने राजकीय संस्थांचा संरचनात्मक दृष्टिकोन मांडला. भारतीय संसद कशी आहे ? तर तिची दोन सभागृहे आहेत. पहिल्याची सभासद संख्या इतकी आहे, दुसऱ्याची सभासद संख्या इतकी आहे, त्यांच्या निवडीची पध्दत कशी काय आहे, त्यांना मिळालेले अधिकार कोणते आहेत वगैरे वगैरे. अशी ही वरवरची आणि संरचनेपुरती मर्यादित अशी तुलना झाली. पण मग भारतीय राजकारणात दिसून येणाऱ्या घटनांचे उदाहरण द्यायचे तर पक्ष बदलूपणाचे कारण आणि त्याचे स्वरूप समजेनासे झाले. भारतीय निवडणुकीमध्ये धर्मांचा एवढा उहापोह कां होतो. जातीला एवढे आवाहन कां होते, भाषेला एवढे आवाहन कां दिले जाते, याची उत्तरेच त्यांना सापडेनात. कारण ते मुळी सांगाड्यामध्येच अडकून पडले. पण भारतीय राजकारणाचा आत्मा त्याच्यात नाही. संसद दोन सभागृहांची आहे का एक हा तुलनेने कमी महत्त्वाचा मुद्दा आहे. ती पांच वर्षासाठी निवडली जाते कां चार वर्षाकरिता निवडली जाते, यालाही फारसे महत्त्व नाही. ती ज्या सामाजिक पार्श्वभूमीवर निवडून येते, निवडणुकीच्या वेळी प्रचाराच्या मंथनामधून जे अमृत आणि जे हलाहल वर येते ते त्या समाजरूपी

महासागराच्या बुडाशी बुडी मारल्याशिवाय समजत नाही आणि या अर्थाने तो तज्ञ असे म्हणतो की, नो ऑनेस्ट बुक हॅज यट बीन रिटन ऑन इंडियन पॉलिटिक्स.

भारतीय राजकारणाकडे वळण्यापूर्वी राजकारणाचे तरी स्वरूप काय आहे ? काय असते ? कशाला राजकारण म्हणावे, याचा थोडा तपशीलात जावून जर आपण विचार केला तर मला वाटते भारतीय राजकारणाचा अभ्यास करायला चांगली पार्श्वभूमी तयार होईल. एका राज्यशास्त्रज्ञाने राजकारणाची अशी व्याख्या केली आहे. " राजकारण म्हणजे कोणाला केव्हां, कसे आणि काय मिळते याचा अभ्यास. " म्हणजे या व्याख्येप्रमाणे राजकारणाचे मुख्य कार्य वाटपाचे आहे. समाजामध्ये वाटणी करणे आणि ही वाटणी कशी होते ? तो म्हणतो निरनिराळ्या समाज गटांच्या तौलनिक शक्तीनुसार होते. ती नेहमीच न्याय्य होते असे म्हणता येणार नाही. कोणाला वारंवार त्यांच्या पदरांत झुकते माप पडते तर कोणाला कितीही प्रयत्न केला तरी पडत नाही. तेव्हां हे जे सामाजिक संपत्तीचे, संधीचे वितरण होते ते नेहमी कोणत्या तरी न्याय तत्वानुसार होते असे नाही तर समाजामधल्या वेगवेगळ्या घटकांच्या तौलनिक शक्तीतून जे समीकरण शेवटी निघते त्या समीकरणानुसार हे वाटप होते आणि ही शक्ती वेगवेगळ्या समाज गटांची, समाज घटकांची सारखी नसते. काही अधिक संघटित असतात. काही कमी संघटित असतात. जे संघटित असतात ते समाजाचे नाक दाबून तोंड उघडायला भाग पाडतात. आणि आपल्या पदरामध्ये अधिक माप पाडून घेतात. एक अतिशय आदरणीय अशा ज्येष्ठ कम्युनिस्ट नेत्या मुंबईत मला एकदा सांगत होत्या की, " राम जोशी, आम्हा कम्युनिस्टांचे काही खरे नाही. जो कारखान्यातला कामगार आहे ज्याला आजच दोन हजार, अडीच हजार, तीन हजार रूपये

महिन्याला मिळतात, त्याला पांच हजार मिळवून देण्यासाठी आम्ही संप करतो. समाजाला वेठीला धरतो आणि ज्यांना मी संघटित करते आहे तो ठाणे जिल्ह्यातला वारली अजूनही कोवळी पाने खाऊन राहतो. पण तीन हजाराचे ऐवजी पाच हजार मिळणाऱ्या कामगाराला एकदाही असे वाटत नाही की यातले शंभर रुपये त्या वारल्यासाठी म्हणून बाजूला काढावेत. तेव्हा आम्ही साम्यवाद्यांनी वैयक्तिक आणि वर्गीय स्वार्थ फक्त प्रज्वलित केला आणि त्यातून सामाजिक आणि आर्थिक समता प्रस्थापित होईल अशी भाबडी आशा बाळगली." अशी त्यांनी माझ्याकडे कबुली दिली. सामुहिक स्वार्थपरायणतेमधून सामाजिक न्याय प्रस्थापना होईल या आशावादाला शास्त्रीय आधार काहीच नाही आणि म्हणूनच संघटित वर्गीय शक्ती ही अधिक उदात्त, अधिक न्याय्य समाजरचनेची उद्‌गाती न ठरता आपल्यापुरतीच राहिली. हा भ्रमनिरास करणारा अनुभव आज जग घेते. सगळ्या कम्युनिस्ट विश्वामध्ये वावटळे उठली आहेत. या वावटळींच्या मागे नैतिक आणि वैचारिक भ्रमनिरास आहे. लासवेल असं म्हणतो की, " राजकारण समाजामध्ये मर्यादित असलेल्या मूल्य आणि वस्तूंचे वाटप कोणाला कधी आणि कसं करते हे वेगवेगळ्या आर्थिक हितसंबंधी गटांच्या तौलनिक शक्तीवरती अवलंबून असते. " याचाच अर्थ असा की, वेगवेगळ्या समाज गटांची शक्ती भिन्न असते, कोणाची जास्त, कोणाची कमी, कोणी अधिक संघटित, कोणी कमी संघटित, कोणी सत्तास्थानाजवळ, कोणी सत्तास्थानापासून अनेक योजने दूर. याच्यामुळे समाजामध्ये संघर्ष अपरिहार्य असतो. आणि संघर्ष आहे म्हणून राजकारण आहे. संघर्ष घडवून आणण्यासाठी नव्हे. अर्थात काही काही वेळेला राजकारण ही देखील भूमिका पार पाडते. जेथे नसेल तेथे सुध्दा संघर्षाची सुरवात करून देते. मतभेद, संघर्ष ही सामाजिक वस्तुस्थिती आहे. या वस्तुस्थितीची अनेक कारणे आहेत. आर्थिक विषमता, शारीरिक विषमता आणि

त्याच्यामुळे जो बलिष्ठ त्याने उत्पादनाची साधने आपल्या मालकीची करून घेतली आणि दुसऱ्यांना त्यांचे श्रम विकण्यावाचून दुसरा काही पर्याय ठेवला नाही, रूसो आपल्या सोशल कॉन्ट्रक्ट पुस्तकामध्ये म्हणतो, " की एक दिवस पहाट झाली, जग जागं झालं. आणि त्यानं पाहिलं तर आदल्या रात्रीपर्यंत मोकळ्या असलेल्या जमिनींच्या भोवती काटेरी कुंपणे रात्रीच्या रात्री घालण्यात आली. " आणि पुढे जाऊन तो असं म्हणतो की, " ज्यांनी ती कुंपणे घातली व इतरांकडून मान्य करून घेतली ते संस्कृती संस्थापक आहेत. " त्यांनी ही संघर्षाची संस्कृती सुरू केली. कारण तेवढी शारीरिक शक्ती त्यांच्याकडे होती. समाजामधले जे वरिष्ठ होते त्यांनी तो पर्यंत म्हणजे आदल्या दिवसापर्यंत समाईक मालकीचे जे होते ते आपल्याच मालकीचे करून घेतले. केवळ दंडुकेशाहीच्या जोरावर करून घेतले आणि दंडुकेशाहीच्या जोरावर पचविले, काहींनी बुध्दीच्या जोरावर इतरांना अंकित करून घेतले. काहींनी आर्थिकबळाच्या जोरावर आर्थिक बळ नसलेल्यांना अंकित करून घेतले. त्यातून संघर्ष ही समाजातली वस्तुस्थिती बनली आहे आणि म्हणून जेथे जेथे मतभेद आहेत, जेथे जेथे संघर्ष आहेत तेथे तेथे राजकारण आहे. राजकारणाला जर तुम्ही आग म्हणणारच असाल तर हे जे संघर्ष आहेत त्यांच्यामुळे ती निर्माण झालेली आहे हे लक्षात ठेवलं पाहिजे. ही धुमसती असंतोषाची आणि संघर्षाची परिस्थिती समाजात असते आणि म्हणून राजकारण आहे हे मुद्दाम एवढ्याकरता सांगायचे की, काही लोक आणि आम्हीसुध्दा विद्यार्थी असताना राज्य संस्था आणि तिची कार्ये हा सगळा राजकारणाचाच भाग आहे म्हणून शिकलो. इथं जर कोणी राज्यशास्त्राचे प्राध्यापक असतील किंवा शिक्षक असतील तर त्यांना सुपरिचित अशी एक व्याख्या आहे. राज्यसंस्थेची वेगवेगळी रूपे इतिहासकाळात कशी बदलत गेली, कशी उत्क्रांत होत गेली आणि तिच्या कार्यक्षेत्रामध्ये कशी वाढ क्रमाक्रमाने होत

गेली या सगळ्यांचा अभ्यास म्हणजे राज्यशास्त्र. याच्यात एक मोठी अडचण अशी आहे की राज्यसंस्थेच्या अनेक कार्यांचे स्वरूप असे असते की, तिथे संघर्ष आणि मतभेद होतातच असे नाही. आणि म्हणून अनेक कार्ये अशी आहेत की, जी राजकारणात येत नाहीत. तुम्ही पोस्ट ऑफिसात जाता, तुम्ही बँकेत जाता, तुम्ही रेल्वे स्टेशनमध्ये तिकिट ऑफिससमोर जाऊन उभे राहता, तुम्ही पैसे देता, तिकिट घेता. तुम्ही चेक फाडता, पैसे घेता, तुम्ही पैसे देता आणि पोस्टाचे तिकीट किंवा पाकिट मिळवता यात कोठेही संघर्ष नाही. आणि म्हणून सगळी कार्ये शासन संस्थेची असली तरी राजकीय नाहीत.

याकरिताच मी दुसऱ्या व्याख्येकडे आलो. कॉन्फ्लिक्ट नसेल तर राजकारण नाही आणि म्हणून राजकारण नाही असे एकही क्षेत्र नाही. भारतासारख्या आशियाई आणि आफ्रिका किंवा इतर विकसनशील देशांमध्ये तर राजकारणाची प्रक्रिया ही एक मध्यवर्ती प्रक्रिया बनलेली आहे आणि त्याचे हे मध्यवर्तीत्व लक्षात घेतल्याशिवाय राजकारणाचे यथार्थ ज्ञान होत नाही. थोडक्यात, राजकारण ही समाजामध्ये बदल घडवून आणण्यासाठी किंवा होऊ घातलेला बदल रोखण्यासाठी केलेली कृती असते.

ज्यांचे हितसंबंध विद्यमान स्थिती म्हणजे जैसे थे स्थिती चालू ठेवण्यामध्ये गुंतलेले आहेत ते बदल रोखण्याचा, त्यात अडसर घालण्याचा प्रयत्न करीत असतात. आणि ज्यांना आपल्या हितसंबंधासाठी नवी समाजरचना, नवी जडणघडण आवश्यक आहे असे वाटते ते बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील असतात. म्हणून त्यांच्यामध्ये संघर्ष होतो आणि म्हणून सगळ्यात चांगली राजकारणाची व्याख्या म्हणजे मी म्हटले तसे समाजात बदल घडवून आणण्यासाठी किंवा बदलाच्या प्रयत्नात अडसर

घालण्यासाठी समाजातल्या विविध घटकांमध्ये जी स्पर्धा चालते त्यातून राजकारणाचा उद्‌भव होतो. " पॉलिटिक्स इज ॲन ऑर्डर मेंटेनिंग ऑर ॲन ऑर्डर ट्रान्सफॉर्मिंग सिस्टिम ऑफ इंटर ॲक्शन बिट्वीन सोशल ग्रुप्स " सोशल ग्रुप्स फार महत्वाचा शब्द आहे. ती सामाजिक घटकांची कृती आहे.

राजकारणाचा जर यथार्थ अभ्यास करायचा तर व्यक्तिशः एकेक माणूस कसा वागतो याच्यापेक्षा समुदायाचा घटक म्हणून तो कसा वागतो या दृष्टीने पाहिले तरच त्याच्या वर्तनाचा अन्वयार्थ लागतो. " पॉलिटिक्स इज अ ग्रुप ॲक्टिव्हिटी " कारण माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. तो वेगवेगळे ग्रुप्स, वेगवेगळे घटक, वेगवेगळे गट बनवित असतो. आर्थिक हितसंबंधासाठी आर्थिक गट बनवितो. सांस्कृतिक आणि शैक्षणिक हितसंबंध जपण्याकरिता त्या तऱ्हेचे गट बनवितो. आणि मनुष्य अशा अनेकविध गटांच्यामार्फत आपले जीवन जगत असतो. या वेगवेगळ्या गटांचा राज्यसंस्थेशी वेगवेगळ्या तऱ्हेचा संबंध येतो. आणि यातले जे संघर्ष राज्यसंस्थेच्या हस्तक्षेपावाचून दूर होऊ शकतात, ते राजकारणाच्या क्षेत्रात येत नाहीत. हा एक आणखी महत्वाचा विचार लक्षात ठेवा. " ऑल कॉन्फ्लिक्टस् डू नॉट लीड टू पॉलिटिक्स " काही संघर्ष हे सामोपचाराने परस्परांच्या स्पर्धेने काही स्वतःच नियम ठरवून त्या मर्यादेमध्ये सोडविता येतात. पण जे संघर्ष असे स्वतंत्रपणे राज्य संस्थेच्या हस्तक्षेपावाचून सुटू शकत नाहीत त्या ठिकाणी राज्यसंस्था हस्तक्षेप करते आणि आपल्यापाशी असलेल्या बळाच्या जोरावर ती जे निर्णय या संघर्षाच्या बाबतीत घेते ते निदान काही काळ तरी समाजाला मान्य होतात. आणि त्याला " ॲथॉरिटेटिव्ह आलोकेशन ऑफ व्हॅल्यूज इन सोसायटी " असे म्हणतात. पॉलिटिक्स काय करते ? " पॉलिटिक्स

ॲथॉरिटिटिव्हज व्हॅल्यू ॲलोकेशन " करते. अधिकृत वाटणी करते. मूल्यांची वाटणी. मूल्ये म्हणजे नैतिक मूल्ये नव्हे तर एकॉनॉमिक व्हॅल्यू ऑफ गुडस् ॲण्ड सर्व्हिसेस. किंवा सोशल व्हॅल्यूज, एज्युकेशन ॲण्ड कल्चर या व्हॅल्यूज. या सगळ्या ज्यांचा पुरवठा मर्यादित आहे, तुटपुंजा आहे आणि ज्याच्या मधून संघर्षाची सुरवात झालेली आहे. रॉबिन्सन क्रुसोच्या कथेमध्ये राजकारण नाही. रॉबिन्सन क्रुसोच्या कथेमध्ये अर्थकारणही नाही. राज्यशास्त्र नाही, अर्थशास्त्र नाही. कारण त्याच्या प्रश्नांचं स्वरूप तांत्रिक आहे. त्याच्या गरजा कमी आहेत आणि ज्या वेगवेगळ्या वस्तूंच्या सहाय्याने तो आपल्या गरजा भागवू शकतो अशा वस्तू अमाप आहेत. परंतु त्याला तांत्रिक ज्ञानाची गरज आहे की ज्याच्यामुळे उदाहरणार्थ लांबचे पाणी दारापर्यंत येऊन त्याला प्यायला मिळेल. म्हणून तो आर्थिक प्रश्न नाही, राजकीय प्रश्न नाही. पण ज्याक्षणी समाजामध्ये वस्तूंचा, सेवांचा किंवा आणखी कुठल्याही गोष्टींचा पुरवठा मागणीपेक्षा कमी होतो त्यावेळेला संघर्षाला एक नवे कारण मिळते. हा संघर्ष काही प्रमाणामध्ये राज्यसंस्थेच्या हस्तक्षेपावाचूनही सुटतो. पण ज्यावेळी तो असा सुटत नाही त्यावेळेला अधिकृत निर्णय देण्यासाठी, निर्णय देण्याची शक्ती असलेली आणि त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी लागणारे शासन करण्याचे बळ असलेली अशी जी राज्यसंस्था आहे तिच्यामार्फत समाज राजकारण करीत असतो. इथपर्यंत जर आपण पाहिलं तर साहजिकच राजकारणामध्ये सामाजिक वस्तुस्थितीचे प्रतिबिंब पडणे हे ओघानेच आले, पण समाज आणि राजकारण यांचा संबंध एकेरी नसतो.

राजकारणात जसे सामाजिक परिस्थितीचे प्रतिबिंब पडते तसे समाज जीवनातही हळूहळू मौलिक बदल घडवून आणण्याचे काम राजकारण

करीत असते. आणि म्हणून राजकारण आणि समाज या दोन्हीही एकमेकांना घडवीत असतात. एकमेकांना बदलीत असतात. एकमेकांच्याध्ये परिवर्तन घडवून आणीत असतात. असा त्यांचा उभयान्वयी संबंध आहे. हे आपण लक्षात घेतले पाहिजे. राजकारणाचे हे स्वरूप लक्षात घेतल्यानंतर मी पुढची पायरी म्हणून विकसित देशांच्या राजकारणाच्या समस्या किंवा प्रश्न कोणते असतात ते सांगतो. याचे कारण भारत हा एक विकसनशील देश आहे. हे आपल्याला सर्वांना मान्य होईल. विकसनशील देशातल्या राजकीय विकासाचे पाच प्रमुख प्रश्न असतात आणि राजकारणाचा अभ्यास या पाच प्रमुख प्रश्नांची उत्तरे त्या देशाचे किंवा समाजाचे राजकारण कशी देतो, कोणत्या प्रक्रियेतून ही उत्तरे शोधली जातात. त्याच्यावरून राजकारणाचे स्वरूप ठरते. कोणते पाच प्रश्न? पहिला प्रश्न राष्ट्रैक्य भावना निर्मित किंवा " नेशन बिल्डिंग ". विकसनशील देश काल परवापर्यंत कुठल्या तरी पाश्चात्य साम्राज्यवादी देशाच्या वसाहती म्हणून वावरत होते. गेल्या ४० वर्षामध्ये ते स्वतंत्र झाले. पण हे जरी राजकीयदृष्ट्या स्वतंत्र झाले असले आणि एक राष्ट्र म्हणून त्यांनी जरी स्वतःला जाहीर केले असले तरी अजून राष्ट्रीयत्वाची भावना काही ठिकाणी निर्माणच झालेली नाही. काही ठिकाणी झाली असली तरी आज दुर्बळ आहे आणि ती मजबूत करण्याचे प्रयत्न चालू आहेत. नेहमी असे म्हटले जाते की, " इंडिया इज ॲन ओल्ड सोसायटी बट ए न्यू नेशन. " भारत हा एक पुरातन समाज आहे पण अगदीच नवोदित राष्ट्र आहे आणि त्यामुळे राष्ट्रीय भावना जेवढी मजबूत असायला हवी तेवढी ती नाही. परचक्र आले म्हणजे ती सबल होते पण त्या आक्रमणाचा धोका नाहीसा झाल्याबरोबर ती भावना पुन्हा दुबळी होते आणि आपापसातले मतभेदाचे मुद्दे वर येतात. आता या भावनेला जर परराष्ट्राच्या आक्रमणाच्या धोक्यामुळेच बळकटी येणार असली तर मला

वाटते आपल्याला चीन व पाकिस्तानबरोबर करारच करायला पाहिजे की तुम्ही दर दोन- चार वर्षांनी जरा आम्हाला धोका निर्माण करा ना म्हणजे मग आमच्यामधल्या राष्ट्रीयत्वाच्या भावनेवरची साठलेली राख जरा फुंकर घालून दूर केली जाईल आणि राष्ट्रवादाचे निखारे पुन्हा प्रज्वलित होतील. पण असे काही नेहमीच होईल असे नाही. राष्ट्रीय ऐक्य भावनेची निर्मिती हा एक अतिशय जटील प्रश्न आहे आणि पाच पंचवीस वर्षांमध्ये चुटकीसरशी त्याची उत्तरे मिळतील असे प्रत्येक समाजात घडते असे नाही. शांततेने याची उत्तरे मिळतील असे प्रत्येक समाजात घडते असे नाही. प्रसंगी यादवी युध्दाला सामोरे जाऊनदेखील राष्ट्रैक्य टिकवावे लागते, लागलेले आहे आणि विकसनशील देशांना तशा प्रकारचा अनुभव घ्यावा लागणारच नाही याची कोणीही हमी देणार नाही.

दुसरा प्रश्न विश्वासार्हतेचा आहे. लेजिस्लेटिव्ह राजकारणाची विश्वासार्हता, राज्यकर्त्यांची विश्वासार्हता, निवडणुकीच्या प्रक्रियेमधून जे राज्यकर्ते अधिकारावर येतात त्या प्रक्रियेची विश्वासार्हता, एकूण राजकारणाशी संबंधित अशा सगळ्याच गोष्टींची विश्वासार्हता हा एक महत्त्वाचा प्रश्न असतो.

तिसरा प्रश्न समाजातल्या अगदी खोलातल्या आणि दूरवरच्या तळापर्यंत प्रशासनाच्या रूपाने पोहोचेल " ॲडमिनिस्ट्रेशन. " कारण राज्यसंस्था विकसनशील समाजामधील एक आधुनिक संस्था आहे. तिला फार मोठी ऐतिहासिक परंपरा नसते. पूर्वी राजे असत, महाराजे असत, सम्राट असत. त्यांचा राज्यकारभार सबंध समाजाच्या सर्वांगीण दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणारा असा सर्वत्र पोहोचलेला नव्हता. सैन्याच्या स्वाऱ्या यायच्या आणि जायच्या. तात्पुरती पाण्याच्या पृष्ठभागावरती चलबिचल व्हावी तेवढ्यापुरते समाज जीवन वरच्यावर हालायचे, विचलित व्हायचे. पण

पुन्हा सर्व काही नेहमीप्रमाणे चालू. मूलभूत असा काही तरी बदल घडवून आणण्यासाठी आवश्यक इतकी प्रशासनाची खोली आणि व्याप्ती गेल्या ४० वर्षांपर्यंत विकसनशील देशांमध्ये गाठली गेलेली नव्हती.

चौथा प्रश्न जनतेचा सहभाग. राजकीय प्रक्रियेमध्ये आणि राजकारणामधून जे प्रश्न सोडवायचे त्यांच्यामध्ये जनतेचा सहभाग. " पार्टिसिपेशन " कसे मिळवायचे हा प्रश्न. लोकशाहीत मतदान हा सहभागाचाच एक प्रकार आहे. पण पाच वर्षांतून एकदा मतदान हा काही पुरेसा सहभाग आहे असे कोणी म्हणणार नाही आणि म्हणून राजकीय, आर्थिक, राष्ट्रीय पुनरूत्थानाच्या कार्यामध्ये सातत्याने आणि फार मोठ्या समुदायाला सहभागी कसे करून घ्यायचे हा एक प्रश्न विकसनशील देशांच्या राजकारणापुढे असतो आणि पाचवा व शेवटचा वितरणाचा प्रश्न. वितरणाचा किंवा डिस्ट्रिब्युशनचा. केवळ मी आधी म्हटले तसे आर्थिक मूल्यांचेच वितरण नव्हे. फक्त वस्तू आणि सेवा यांचेच वितरण नव्हे तर शिक्षणाचे, संस्कृतीचे, आधुनिकतेचे ही जी सगळी मूल्ये आहेत त्यांचे वितरण समाज मान्य करील अशा न्याय्य पध्दतीने कसे होईल या संबंधीची विचक्षणा हाही विकसनशील देशातील राजकारणाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

राष्ट्रीय उभारणीचे किंवा राष्ट्रैक्यभावना निर्माण करण्याचे काम हा राजकारणाचे एक प्रधान अंग झालेले आहे. याचे कारण विकसनशील देशामधले हे जे परंपरागत समाज आहेत ते जाती, धर्म आणि इतर वेगवेगळ्या गटांमध्ये विखुरलेले आहेत. आणि माणसाचे जीवन हे त्या विवक्षित गटानुसार ठरते आणि व्यापक राष्ट्रीय निष्ठा नव्याने निर्माण करावयाची आहे. आणि ती कशी निर्माण करावयाची याच्यावरून राजकारणाचे स्वरूप ठरते. त्याचे दोन पर्यायी मार्ग आहेत. एक मार्ग

असा की अशी एक कणखर जबरदस्त हुकूमत, अशी एक मजबूत सत्ता प्रस्थापित करायची की त्या सत्तेने, कायद्याने आणि दंडुकेशाहीने भाषेविषयीची निष्ठा, प्रांताविषयीची निष्ठा, धर्माविषयीची निष्ठा ह्या सगळ्या संकुचित निष्ठा दडपून टाकायच्या आणि फक्त माझे राष्ट्र एवढी एकच निष्ठा लोकांच्यामध्ये बाणवायची. आक्रमक राष्ट्रवादी असे हे धोरण होईल. आणि त्यासाठी इतर सर्व निष्ठांच्यावरती वरवंटा फिरवण्याचे काम करावे लागेल. इतिहासामध्ये अशी उदाहरणे आहेत. मुसोलिनीचे आहे. हिटलरचे आहे. इतर कोणत्याही निष्ठा या तेवढ्या संकुचित आहेत. फक्त राष्ट्राचीच निष्ठा किंवा धर्माचीच निष्ठा तेवढी महत्त्वाची, बाकीच्या सगळ्या निष्ठा या निरर्थक आहेत असे म्हणून त्या कायद्याने आणि दमनाने दडपून टाकणे आणि एकच निष्ठा लोकांच्यामध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न करणे हा एक मार्ग झाला. दुसरा मार्ग विविधतेतून एकता साधण्याचा. तो भारतानं स्वीकारलेला आहे. भारतामध्ये अनेक धर्म आहेत. अनेक भाषा आहेत, प्रादेशिक अहंता आहे. या सगळ्या अहंता आणि अस्मिता आपापल्या मर्यादेत जोपर्यंत आहेत तोपर्यंत त्यांचे स्वागत करायला काहीच हरकत नाही आणि त्या दडपून टाकण्याचा प्रयत्न करू नये. किंबहुना या सगळ्यांच्या विविधतेतून राष्ट्रीय एकतेला काही एक वेगळी शक्ती कशी निर्माण करून घेता येईल याचा विचार हा तो दुसरा मार्ग आपल्या सगळ्या राष्ट्रवादी आंदोलनाची हीच परंपरा राहिलेली आहे. काँग्रेसची हीच परंपरा राहिलेली आहे. गांधी, नेहरू आणि आधीचे नेते यांचीही हीच परंपरा राहिलेली आहे की, भारत हा वैविध्यपूर्ण देश आहे. अनेकविध वेगळेपणाने नटलेला हा समाज आहे. आणि हे आमचे भूषण आहे, ही आमची शक्ती आहे. कोणत्याही फुलाच्या जशा अनेक पाकळ्या असतात पण त्या सगळ्या पाकळ्यांचे मिळून एक फूल होते त्याप्रमाणे अनेक धर्म, अनेक भाषा, अनेक इतर वैविध्ये असली तरी त्या सगळ्यांचे

मिळून एक भारतीय मानस, एक भारतीय अस्मिता, एक भारतीय एतद्देशिय भावना अशी आपल्यास निर्माण करावयाची आहे. हा दुसरा मार्ग झाला. आता या दोन मार्गांपैकी कोणत्याही एकाचा अवलंब करणाऱ्या समाजामध्ये राजकारणाचे स्वरूप मूलतः भिन्न होईल की नाही? एका ठिकाणी हुकूमशाहीचे राजकारण चालेल तर दुसरीकडे लोकशाहीचे व व्यक्ती स्वातंत्र्याधिष्ठित राजकारण चालेल. लोकांना मोकळेपणाने आपल्या भाषेचा अभिमान व्यक्त करता येईल. आपल्या धर्माचा अभिमान व्यक्त करता येईल. आपापल्या मर्यादेमधील सगळे अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य व्यक्तीला मिळेल व त्यामुळे राजकारणाचे स्वरूप मूलतः बदलेल.

दुसरा प्रश्न राज्यपध्दतीबद्दल व राज्यकर्त्यांबद्दल लोकांमध्ये विश्वासार्हता निर्माण करणे. हा प्रश्न निवडणुकीशी, कायद्याचे राज्य या संकल्पनेशी आणि सत्तेच्या विकेंद्रीकरणाशी जोडलेला आहे. कालच मी मुंबईला यशवंतराव चव्हाण स्मृतिदिनानिमित्त व्याख्यान देत होतो. त्या व्याख्यानाचा विषय निवडणूक सुधारणा असा होता आणि त्या ठिकाणी मी हीच चिंता व्यक्त केलेली होती की निवडणूक पध्दतीमध्ये आणि निवडणूक व्यवहारांमध्ये जे दोष आहेत त्यांच्यामुळे निवडणुकीवरचा लोकांचा विश्वास डळमळीत व्हायला लागला आहे. असा जर तो झपाट्याने डळमळीत होऊ लागला आणि नाहीसा व्हायला लागला तर राज्यकर्त्यांची विश्वासार्हता आणि लोकशाही पध्दतीची विश्वासार्हता नाहीशी व्हायला वेळ लागणार नाही. आणि एकदा ही विश्वासार्हता गेली की पुन्हा नव्याने निर्माण करणे हे फार दुरापास्त काम आहे. काचेला तडा गेल्यासारखी परिस्थिती होणार आहे आणि म्हणून सर्वांनी, सर्व राजकीय पक्षांनी आणि विचारवंतांनी निवडणूक प्रक्रियेची आणि त्यावर आधारलेल्या लोकशाहीची विश्वासार्हता घटणार नाही यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न

करायला पाहिजेत. तेवढे ते प्रामाणिकपणाने करीत नाहीत अशी माझी तक्रार आहे. माझा दृढ विश्वास आहे की निवडणूक सुधारणा त्याच वेळेला यशस्वी होऊ शकतील ज्यावेळेला पक्षांच्या घटनेमध्ये व कार्यपध्दतीमध्ये आमूलाग्र सुधारणा होईल. नाही तोपर्यंत निवडणूक सुधारणा काहीही बदल घडवून आणू शकणार नाहीत म्हणून सर्व प्रथम " रिफॉर्म लाइक चॅरिटी मस्ट बिगिन ॲट होम " आधी पक्ष सुधारणा करा. अंतर्गत लोकशाहीने आपापल्या पक्षांचे कारभार चालवा. पक्षांतर्गत निवडणुका घ्या. लोकांच्याकडून जमा केलेल्या पै पैशाचा हिशोब जाहीर करा. तो निवडणूक आयोगाकडून तपासून आणि ऑडिट करून घ्या. एकूण काय तर राजकीय पक्षांचे स्वतःचे आणि आपापसातले व्यवहार जेवढे स्वच्छ होतील तेवढ्या प्रमाणात सार्वत्रिक निवडणूकाही स्वच्छ होतील. ते करायचे प्रत्येक राजकीय पक्ष टाळीत असतो. पक्षांचे निवडणुकीत दिलेले आश्वासन काय ? तर आमचे सरकार आले तर आम्ही निवडणूक पध्दतीमध्ये सुधारणा घडवून आणू. पण आम्ही पक्षांच्या कार्यपध्दतीमध्ये सुधरणा घडवून आणू असे कधी कुणी वचन देत नाही. म्हणून विश्वासार्हता हा राजकारणाचा केंद्रस्थानी असलेला प्रश्न आहे आणि तो निवडणूक पध्दतीशी कायद्याचे राज्य या संकल्पनेशी आणि सत्तेच्या विकेंद्रीकरणाशी संबंधित आहे.

विकेंद्रीकरण वेगवेगळ्या समाजात वेगवेगळ्या पध्दतीने होते आणि म्हणून राजकारणाचे स्वरूप वेगवेगळ्या पध्दतीचे आपल्याला दिसून येते. राजकारणाचा अभ्यास करण्याची एक दिशा म्हणजे सत्तेचे विकेंद्रीकरण झाले आहे की नाही, किती प्रमाणात झालेय, ते कसे झालेय. लगेच तुम्हाला एक महत्त्वाचा असा निकष हातामध्ये मिळाला. राजकारणाचा अभ्यास करण्यासाठी समाजामध्ये फार दूरवर आणि खोलवर पोहोचण्याचे

काम राज्यसंस्था तिच्या प्रशासनामार्फत करते. अशा प्रशासन संस्थांचे आडवे उभे जाळे विणणे ही विकसनशील राष्ट्रापुढली फार महत्त्वाची गरज असते. आणि व्यक्तीचे जीवन जेवढे अशा आडव्या उभ्या धाग्यांनी घट्ट विणलेल्या स्वरूपाचे असेल तेवढा त्या देशाच्या राजकारणाला, लोकशाहीला विस्तृत व खोल आधार निर्माण होईल. आपल्याकडेसुध्दा असे दिसते की, मधल्या स्तरावरच्या ज्या संस्था आहेत त्या अतिशय तकलादू आहेत. म्हणून असहाय्य नागरिक एकटा आणि त्या जाणिवेपायी भयग्रस्त झालेला आढळतो असा नागरिक एका बाजूला आणि प्रचंड सत्तेचे केंद्रीकरण झालेली राज्यसंस्था दुसऱ्या बाजूला यांच्यामध्ये मध्यस्थी करणाऱ्या संस्था आपल्याला निर्माण करायला पाहिजेत. जिल्हा परिषदा तेवढ्याकरिताच केलेल्या होत्या. स्थानिक स्वराज्य संस्थांचे ते कार्य असते. पण जर पंधरा पंधरा वर्षे जर त्यांच्या निवडणुकाच घेतल्या नाहीत तर व्यक्तीमधील असहाय्यता वाढत जाते. व्यक्तिमधली एकलेपणाची भावना वाढत जाते आणि त्याच्यामधून मग भल़भलत्या विचारांचे आकर्षण व्यक्तीला वाटू लागते. हुकूमशाहीच्या वृत्तीचेसुध्दा आकर्षण वाटू लागते कारण कुठेतरी माणूस सुरक्षितता शोधीत असतो. भारत हा विकसनशील देश आहे हे आपण पाहिलंत. त्यामुळे या देशापुढेसुध्दा या पाच समस्या आहेत. त्या पाचापैकी जर डावे उजवे करायचे म्हटले व अग्रक्रम लावायचा म्हटला तर तीन गोष्टी अधिक महत्त्वाच्या आहेत. त्या तीन गोष्टी म्हणजे राष्ट्रीय ऐक्य भावना संवर्धन, राजकीय सहभागात वाढ आणि आर्थिक विकास आणि त्याचे न्याय्य वाटप. आता तुम्हाला भारतीय राजकारणाचा अभ्यास या तीन गोष्टींच्याकडे पाहून करायला सुरवात करता येईल.

तो करीत असताना आणखी एका गोष्टीची मला आपल्याला आठवण करून द्यायची आहे. ती अशी की, भारतामध्ये लोकशाही राज्यपध्दतीची सुरवात ऐतिहासिक क्रमाला उलटी कलाटणी देऊन झालेली आहे. हा महत्त्वाचा विचार मी आपल्यापुढे ठेवतो आहे. पाश्चात्य देशांमध्ये ज्या ज्या ठिकाणी लोकशाही राज्यपध्दती पुढे विकसित झाल्या त्या त्या देशांमधला ऐतिहासिक उत्क्रांतीक्रम जर तुम्ही पाहिलात तर असे दिसेल की औद्योगिक क्रांति प्रथम झाली. औद्योगिक क्रांतिमुळे आर्थिक शक्ती वाढल्या. या आर्थिक शक्तींच्यामुळे मध्यमवर्गाचे प्राबल्य वाढले. त्याला सरंजामदारी पध्दतीमधले निर्बंध जाचक वाटू लागले आणि म्हणून त्या वर्गाने आर्थिक व राजकीय क्षेत्रात मुक्त स्पर्धेचा आग्रह धरला. त्याच्यामुळे लोकाधिष्ठित राजकारण किंवा लोकशाहीप्रधान राजकारण ऐतिहासिक विकासाचा एक परिणाम म्हणून घडून आले. ऐतिहासिक आर्थिक विकास हे कारण आणि राजकीय विकास हा परिणाम असा हा कार्यकारण संबंध होता. हा जो पाश्चात्य देशांमधील ऐतिहासिक क्रम आहे. तो क्रम भारतामध्ये नेमका उलटा झालेला आहे आणि राजकारणाला प्राथम्य किंवा सेंट्रलिटी आणि राजकारणाचा आर्थिक विकासासाठी साधन किंवा हत्यार म्हणून हेतूतः केलेला उपयोग असा क्रम झाला. आर्थिक विकासाची उद्दिष्टे साधण्यासाठी हेतूपुरस्सर केलेला राज्य संस्थेच्या शक्तींचा आणि अधिकारांचा म्हणजेच राजकारणाचा साधनरूप उपयोग इतके प्राधान्य आणि प्राथम्य राजकारणाला या देशात आले. तसे होणे क्रमप्राप्तच होते. कारण देश स्वतंत्र झाला पाश्चात्यांच्या सहवासामुळे. त्यांच्याशी झालेल्या संपर्कामुळे आधुनिक विचार या देशामध्ये आला. व्यक्तिवादाचा, लोकशाहीचा, आर्थिक विकासाचा आणि आर्थिक नियोजनाचा असे सगळे आधुनिक विचार या समाजामध्ये पाश्चात्य राज्यकर्त्यांशी आलेल्या संपर्कामुळे आणि जग झपाट्याने जवळजवळ येत चालले या घटनेमुळे

दळणवळणाच्या साधनांमध्ये झालेल्या प्रगतीमुळे देशामध्ये हे सगळे नवे विचार आले. जेव्हा देश स्वतंत्र झाला तेव्हा साहजिकच राष्ट्रीय नेत्यांनी असा विचार आणि निर्णय केला की राजकीय शक्ती जी नव्याने प्राप्त झालेली आहे तिचा उपयोग करून इच्छित आणि अपेक्षित असा सामाजिक आणि आर्थिक बदल आपल्याला घडवून आणायचा म्हणून राजकारणाला मध्यवर्तीत्व आले. राजकीय आणि बिगर राजकीय अशी समाजाची आणि समाज जीवनाची दोन अगदी स्वतंत्र अंगे आपल्याला कल्पता येतच नाहीत. राजकारणाची छाया सबंध समाजावरती पडते. ती फार मोठी चांगली गोष्ट आहे. असे माझे म्हणणे नाही परंतु ती अपरिहार्य आहे. अटळ आहे. आणखी काही दशके तरी समाजामध्ये स्वायत्तता वाढेल आणि राज्य संस्थेचे मध्यवर्तीत्व आणि प्राथम्य आपल्याला टाळता येईल असे मला वाटत नाही.

शेवटचा विचार मांडून मी आजचे व्याख्यान संपविणार आहे. तो म्हणजे भारतीय राजकारणाचे जे विविध संदर्भ आहेत त्यांचा आपण प्रथम अभ्यास करायला हवा. कारण या संदर्भाच्या स्वरूपांच्या ज्ञानामधूनच राजकारणाच्या स्वरूपाचे ज्ञान प्राप्त होऊ शकेल. मी काही वेळापूर्वी आपल्याला सांगितले की कोणतेही राजकारण निर्वात पोकळीमध्ये घडत नाही. त्याला ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक संदर्भ असतात. वैचारिक किंवा तात्विक संदर्भही असतात. तत्वज्ञानात्मक संदर्भ, आयडिऑलॉजिकल कॉन्टेक्स्ट असतो. त्या संदर्भाचा उल्लेख करायला हवा. कारण ते लक्षात घेतल्याशिवाय भारतीय राजकारणाचा अभ्यास करता येणार नाही. कोणत्याही देशाच्या राजकारणाचा अभ्यास करण्याची तीच रीत असते. निदान असायला हवी म्हणून भारतीय राजकारणाच्या अभ्यासाची एक दिशा म्हणून, भारतीय समाजाचा आपण आधी अभ्यास

करायला पाहिजे. भारतामधल्या धार्मिक परिस्थितीचे स्वरूप प्रादेशिक अहंतेचे स्वरूप, त्याच्या मागची ऐतिहासिक पार्श्वभूमी, या देशाची हजारो वर्षांची संस्कृती, त्या संस्कृतीची परंपरा, हर प्रकारची विविधता, व्यापक दारिद्र्य, सार्वत्रिक अज्ञान या सर्व गोष्टीचे ओझे डोक्यावरती घेऊन हा समाज नवतेकडे किंवा आधुनिकतेकडे जात आहे.

भारतीय समाजाच्या सगळ्या परंपरांच्याकडे जर आपण नीट पाहिले, योग्य दृष्टीने पाहिले तर या परंपरांच्यामधून प्रेरणादेखील मिळू शकेल. पण आपल्याला फारच विचक्षक दृष्टी ठेवली पाहिजे, कारण फार थोड्या परंपरा आजच्या काळाची आणि उद्याच्या प्रश्नांची उत्तरे देण्याच्या दृष्टीने प्रेरक ठरणाऱ्या आहेत. बाकीच्या अनेक परंपरा या ओझ्यामध्ये जमा होतात आणि हे ओझं आपण पाठीवरचे उतरविल्याशिवाय आपल्या चालीला किंवा धावण्याला वेग येणार नाही.

या सर्व प्रकारच्या विविधतेमध्ये पृथगात्मक असलेला हा समाज आधुनिकतेकडे जो प्रवास करतो आहे त्याचा राजकीय संदर्भ आणि राजकारणाला असलेला हा परंपरेचा वारसा असा परस्परांचा अभ्यास एकसमयावच्छेदे केल्याशिवाय राजकारणाचा पृथ्थक अभ्यास चुकीच्या दिशेने घेऊन जाईल. समाजाचा आणि परंपरेचा पृथ्थक अभ्यास देखील चुंकीच्या दिशेने घेऊन जाईल. शेवटचा विचार मांडून मी आजची जी तात्विक बैठक आहे तिचा समारोप करतो. म्हणजे मग आज तयार केलेल्या या वैचारिक चौकटीच्या अनुरोधाने भारतीय राजकारणाचा अधिक तपशीलवार अभ्यास आणि विशेषतः भारतीय लोकशाहीला केंद्रस्थानी असलेली निवडणूक आणि पक्षपध्दती या दोन महत्वाच्या राजकीय संस्थांच्या आतापर्यंतच्या प्रगतीचा अभ्यास आणि त्यातून उपस्थित

झालेल्या प्रश्नांचा अभ्यास उद्याच्या आणि शेवटच्या व्याख्यानांत आपल्याला करता येईल.

तो शेवटचा तात्विक विचार असा, लोकांचा सहभाग वाढवत नेण्याची इच्छा असणे ही गोष्ट इष्ट आहे, परंतु तो सहभाग व्यवस्थित कायद्यांच्या चौकटीत, शांततेच्या मार्गानी झाला पाहिजे आणि जर शांततेच्या मार्गानी होत नसेल तर निदान तो आपल्याला काबूत ठेवता येईल एवढी शक्ती राजकीय संस्थांच्यामध्ये असली पाहिजे. आणि म्हणून इथं मी एक शेवटचा विचार म्हणून मांडतो तो असा की, राजकीय विकास हा एका बाजूला जनतेचा वाढता सहभाग आणि दुसऱ्या बाजूला राजकीय संस्थांचे उभे केलेले जाळे यांच्यात परस्पर संबंधाच्या परिणामी होत असतो. " पोलिटिकल डेव्हलपमेंट इज ए फंक्शन ऑफ द रिलेशनशीप बिट्विन पॉप्युलर पार्टिसिपेशन अँड पोलिटिकल इन्स्टिट्यूशन्स " राजकीय संस्था त्यामध्ये मग राष्ट्राध्यक्ष आले, पंतप्रधान आले, मंत्रिमंडळ आले, संसद आली, विधानसभा आल्या, न्यायमंडळे आली, जिल्हा परिषदा आल्या, ह्या सगळ्या आल्या. हे दूरवर पसरलेले राजकीय संस्थांचे जाळे एका बाजूला आणि लोकांचा वाढता सहभाग दुसऱ्या बाजूला. आपण स्वतंत्र झाल्याबरोबर हा सहभाग वाढावा याच्यासाठी ऐतिहासिक असे एक महत्त्वाचे पाऊल आपण टाकले ते म्हणजे प्रौढ मतदानाचे. एकवीस वर्षावरच्या सगळ्या स्त्री-पुरूषांना आपण मतदानाचा हक्क दिला. जे आपसूक मिळते ना त्याचे महत्व वाटत नाही. इंग्लंडमधील स्त्रियांना विचारा मतदानाचा हक्क म्हणजे काय ते. पन्नास-साठ वर्षे संघर्ष द्यावा लागला तेव्हा १९११ साली स्त्रियांना तीस वर्षे वयाच्या वरच्या स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळाला. पुरूषांना मात्र एकवीस वर्षे झाल्याबरोबर मिळाला. आणि स्त्रियांना आणखी काही वर्षे थांबायला लागले. तेव्हा

१९२८ साली एकवीस वर्षावरील स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळाला. स्वित्झर्लंडमध्ये अजूनही स्त्रियांना मतदानाचा हक्क नाही. आपल्याकडे मागणी न करता, लढा न करता प्रौढ मतदानाचा हक्क मिळाल्यामुळे त्याचे महत्व लोकांना वाटत नाही. पण अतिशय क्रांतिकारी असे हे पाऊल होते ते. एकवीस वर्षावरील सगळ्या स्त्री-पुरूषांना राजकीय प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेणे. पहिल्या निवडणुकीमध्ये इतके मतदार होते की युरोप मधला रशिया सोडला तर उरलेल्या सगळ्या राष्ट्रांच्या लोकसंख्येपेक्षा जास्त लोक आमचे मतदार होते. इतक्या प्रचंड प्रमाणावरती लोकांचा सहभाग मिळवायचा तर राजकीय संस्थाही एकीकडे लवचिक तर दुसरीकडे भक्कम असायला हव्यात. त्या जर जास्त भक्कम झाल्या तर राजकारण हळूहळू हुकूमशाहीच्या दिशेने जायला लागेल. त्या संस्था जर अधिक लवचिक आणि लवचिक होता होता दुबळ्या झाल्या आणि लोकांचा सहकार नीट दिशेला वळवता येईनासा झाला म्हणजे अराजक होते. म्हणून अराजक टाळायचे असेल आणि ओव्हर इन्स्टिट्यूशनलायझेशन म्हणजे हुकूमशाहीकडे होणारी वाटचालपण टाळावयाची असेल तर राजकीय संस्था आणि लोकांचा सहभाग यांच्यामध्ये मैत्रीपूर्ण आणि सलोख्याचे संबंध कसे राहतील हे पाहणे अतिशय महत्वाचे आहे. हे आपण गेल्या चाळीस वर्षात कसे पहात आलो, त्यात कुठे यश मिळाले, कुठे अपयश आले, याच्यापुढं काय करता येण्यासारखं आहे याचा विचार केला पाहिजे. आता तर मतदान हक्काच्या दृष्टीने आपण एकवीसवरून अठरावर्षापर्यंत आलेलो आहोत. या सगळ्यांचा भारतीय राजकारणाच्या भावी वाटचालीच्या दृष्टीने काय संबंध आहे, याचा विचार आपण उद्याच्या व्याख्यानामध्ये करू.

✿✿✿

...ANTRAO CHAV...
MUMBAI
400 021

‘मा. यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला’

# भारतीय राजकारण : अभ्यासाची एक दिशा

व्याख्यान दुसरे

१४ मार्च १९९०

कालच्या व्याख्यानामध्ये मी राजकारणाचा नेमका गाभा काय असतो आणि राजकारणाचा सखोल अभ्यास करायचा असेल तर समाजाचा अभ्यास का करावा लागतो ते स्पष्ट केले. कारण, काल मी म्हटले की, कुठलेही राजकारण निर्वात पोकळीमध्ये घडत नाही, समाजामधल्या समस्या, समाजातले वेगवेगळे संघर्ष, समाजामधले ताण आणि तणाव आणि समाजामधली विविध हितसंबंधामधली आणि हितसंबंधी गटांमधली स्पर्धा या सगळ्यांमुळे राजकारणाला प्रेरणा मिळत असते. जर आपण असा मतभेदविरहित, संघर्षविरहित, ताण आणि तणावविरहित समाज कल्पू शकलो तर अशा समाजात राजकारणाचे काही प्रयोजन राहणार नाही. पण असा समाज सुदैवाने म्हणा, दुर्दैवाने म्हणा अस्तित्वात कुठेच असत नाही. ॲरिस्टॉटल असे म्हणायचा की, ' माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. ' आणि तो स्वयंपूर्ण नसल्या कारणाने आपल्या शारीरिक, आर्थिक, भावनिक, मानसिक गरजा पुऱ्या करण्यासाठी दुसऱ्या मानवाच्या बरोबर तो संघ करून राहतो. पण माणूस नुसता समाजप्रिय प्राणी आहे, एवढेच त्याचे वर्णन नाही तर तो भांडखोरही आहे. त्याला माणसावाचून करमत नाही. पण माणसाशी त्याचे जमत नाही, पटत नाही. अशा दोन्ही भावना माणसामध्ये असतात. प्रथम छोटा समाज, छोट्या समाजातून मोठा समाज, त्यातून अधिक मोठा समाज अशी समाजाची जी उत्क्रांती गेली

हजारो वर्षे होत आली त्यामुळे समाज संघटनेचा प्रश्न बिकट होत गेला. रस्त्यावरून दोन चार माणसे चालत असली आणि त्यांनी वाहतुकीचे नियम पाळले नाहीत तरी फारसे बिघडत नाही. पण शेकडो आणि हजारो माणसे रस्त्याचा वापर करू लागली आणि पादचाऱ्यांबरोबर वाहनेही रस्त्यांचा वापर करू लागली की मग कोणी कुठल्या रस्त्याच्या भागाचा उपयोग करावा, कोणत्या दिशेने वाहने जावीत, कोणत्या दिशेने पादचाऱ्यांनी जावे, त्यांच्यासाठी रस्त्याचा कोणता भाग राखून ठेवायचा, हे मग ओघानेच आले. कारण एरव्ही रस्त्यावरून चालणे जिकीरीचे आणि धोक्याचे होते. एकदा असे रस्त्याचे भाग पाडून पादचाऱ्यांचेसाठी हा आणि वाहनांच्यासाठी हा असे म्हटल्याबरोबर या नियमांचे पालन लोक करतात की नाही हे पाहणे ओघानेच आले. म्हणजे मग त्यासाठी रस्ता वाहतूक यंत्रणा आली. नियमांचे पालन होते की नाही हे पाहण्यासाठी यंत्रणा आली. नियमांचे उल्लंघन करतात त्यांना शासन देण्याची यंत्रणा - नियम - नियमावली हेही सगळे आले. छोटेसेच रोजच्या अनुभवातले हे उदाहरण आहे म्हणून मी घेतले. रहदारीचा काही एकच प्रश्न समाजामध्ये नसतो. सहस्त्रावधी प्रश्न असतात. या सगळ्या प्रश्नांतून मार्ग काढणे आणि समाजजीवन सुरक्षित, शांततामय आणि सुलभ व्हावे यासाठी त्या समाजामध्ये नियम करावे लागतात. नियम केल्यानंतर ते कुणीतरी उल्लंघणार हे गृहित धरावे लागते. त्यांना शासन करण्याची व्यवस्था करावी लागते. या सगळ्या प्रक्रियेमधून राज्यसंस्थेचा उदय झाला आणि ती राज्य संस्था कोणाच्या हातामध्ये असावी याच्यावरून नवे संघर्ष सुरू झाले. कारण ही राज्य संस्था स्वतःला जरी निरपेक्ष म्हणत असली तरी ती तशी निरपेक्ष नसते. ती पक्षपाती असते, ती दुसऱ्या माणसाचा पक्षपात करते, त्याच्याऐवजी माझा पक्षपात करावा अशी मागणी समाजामध्ये व्यक्ती आणि व्यक्तींचे गट करू लागतात.

मार्क्सची राज्यसंस्थेसंबंधीची जी मीमांसा आहे ती याच प्रकारची आहे की, समाजामध्ये आर्थिक वर्ग निर्माण झाल्याबरोबर जो आर्थिकदृष्ट्या बलवत्तर वर्ग होता त्यांनी राज्यसंस्था आपल्या हातात ठेवण्याचा प्रयत्न केला आणि त्यामध्ये त्याला यश आले. आणि म्हणून तो म्हणतो की, आधुनिक राज्यसंस्थेचे जे मंत्रिमंडळ असते ते मंत्रिमंडळ म्हणजे एका परीने भांडवलदारी कंपनीच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्ससारखेच असते आणि त्याच्या हितसंबंधाचे रक्षण करणे आणि त्यासाठी श्रमिकांच्या संघटना मोडून काढणे, त्यांनी संप केले तर ते बेकायदा ठरविणे व एवढे करून त्यांनी संप केले तर ते मोडून काढणे. पाशवी बलाचा उपयोग करून हे सगळे राज्यसंस्था करीत असते. म्हणजे जोपर्यंत समाजामध्ये वर्ग आहेत तोपर्यंत राज्यसंस्था राहणारच आणि ती बलवत्तर वर्गाच्या हातातील बटिक म्हणून काम करणार. त्याच्यावर मार्क्सनी असे उत्तर शोधले की, जर राज्यसंस्था विलयाला जावी असे वाटत असेल, शासनसंस्था नको असे वाटत असेल तर समाजामधले वर्गीय संघर्ष आपण दूर केले पाहिजेत आणि जमीनदारवर्ग विरुध्द शेतकरीवर्ग, भांडवलदारवर्ग विरुध्द कामगारवर्ग अशी जी विभागणी समाजाची झालेली आहे ती नाहीशी करून समाजवाद आणि साम्यवाद आणून पुन्हा एकदा निर्वर्ग समाज निर्माण केला पाहिजे, वर्गहीन समाज निर्माण केला पाहिजे आणि असा एकदा वर्गहीन समाज निर्माण झाला म्हणजे मग राज्यसंस्थेचे इतिहासदत्त कार्य संपुष्टात येईल आणि मग तिला काही कार्य नसल्याकारणाने साप जसा निरुपयोगी झालेली कात टाकून देतो त्याप्रमाणे समाज ही निरुपयोगी झालेली शासनसंस्था किंवा दंडसंस्था टाकून देईल, ती विलयाला जाईल, अशा प्रकारचे स्वप्नरंजन मार्क्सने आणि मार्क्सच्या अनुयायांनी केले. त्याच्या तपशीलात मी जात नाही. त्याचे काय झाले ते कुणीही क्षणभर जरी साम्यवादी जगात काय चाललेले आहे त्याच्याकडे ओझरती नजर

टाकली तरी लगेच लक्षात येईल. जे इतर स्वप्नांचे होते तेच याही स्वप्नाचे झाले म्हणजे ते भंग पावले. वर्गविहीन समाजरचनाही झाली नाही आणि झाली असा जिथे दावा केला गेला तिथेही सापाने कात टाकावी तशी त्या समाजाने राज्यसंस्था टाकून दिली नाही. म्हणजे राज्यसंस्थेच्या अस्तित्वाला कारणीभूत असलेले मतभेद आणि संघर्ष हे केवळ आर्थिक नसतात. ते अनेक प्रकारचे असतात आणि म्हणून समाजाच्या उत्क्रांतीची केवळ आर्थिक मीमांसा मार्क्सने केली ती अपुरी आहे. ती चुकीची आहे असे नाही परंतु ती अपुरी आहे आणि ती अपुरी म्हणून इतिहास क्रमामध्ये चुकीची ठरली. समाजाच्या उत्क्रांतीप्रक्रियेमध्ये अनेक मतभेद, अनेक प्रकारचे संघर्ष, अनेक प्रकारचे तणाव कारणीभूत असतात. तसे जर नसते आणि ज्यांचा विचार एक आहे, ज्यांचे हितसंबंध एक आहेत त्यांचा एकच वर्ग असे जर असते तर जगातील कामगारांनो एक व्हा, या मार्क्सच्या आवाहनाची वाताहत का झाली असती ? एका देशातले काय एका कारखान्यातले कामगारसुध्दा एक होत नाहीत. वैचारिक मतभेदामधूनही माणसाला वेगळे संघटन करावेसे वाटते आणि आपण केलेल्या या वैचारिक संघटनेनुसार समाजाची पुनर्रचना करावी यासाठी राज्यसंस्था आपल्या हातात असावी असे वाटत असते. एवढ्याकरिता राज्यसंस्थेचा हा मागला सगळा सामाजिक संदर्भ नेहमीच लक्षात घ्यावा लागतो.

काल मी आणखी असे एक विधान केले की, भारत हा एक प्राचीन समाज आहे पण ते एक नवराष्ट्र आहे. " An Old Society but young Nation " पाच हजार वर्षाचा समाज आणि स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र म्हणून चाळीस पंचेचाळीस वर्षाचा फक्त प्रपंच. साहजिकच राज्य कारणामध्ये या पाच हजार वर्षाच्या सामाजिक परिस्थितीचा आणि सांस्कृतिक, धार्मिक, जातीसंस्था या सगळ्या संदर्भाचे प्रतिबिंब

राजकारणामध्ये पडणे हे अपरिहार्य होते. ही जी आपली सांस्कृतिक आणि वैचारिक परंपरा आहे त्यातल्या काही गोष्टींचा उल्लेख मला इथं आवर्जून करायला पाहिजे. कारण राजकारणावरती, राजकारणाच्या स्वरूपावरती त्याचा फार खोलवर असा परिणाम झालेला आहे. त्यातली पहिली गोष्ट किंवा वस्तुस्थिती याच्याकडे मला आपले लक्ष खेचायचे आहे. ती म्हणजे प्राचीन भारतामध्ये राजकीय तत्वज्ञानाचा प्रभाव नाही. भारतीय तत्वज्ञानाचा प्रमुख स्त्रोत धार्मिक आणि अध्यात्मिक तत्वज्ञानाचा. कौटिल्याचा " अर्थशास्त्र " हा राज्यशास्त्रावरचाच ग्रंथ आहे हे मला माहित आहे. पण त्या ग्रंथातही जो विचार आहे तो राज्य कसे चालवावे, कोणती धोरणे आखावीत, कोणती काळजी घ्यावी याचा. या संबंधीचा विचार कौटिल्याने जेवढा तपशीलात जाऊन केलेला आहे तेवढा राजकीय तत्वज्ञानाचा केलेला नाही.

भारतीय मानस ऐहिक जीवनाकडे तुलनेने कमी बघत असणार आणि आध्यात्मिक भविष्याबद्दलचे आकर्षण अधिक असणार याच्यांमुळे या देशामध्ये जी वेगवेगळी तात्विक दर्शने उभी राहिली, त्या दर्शनांच्यामध्ये खूपच प्रगती झाली. जगाने अचंब्याने भारताच्या बौध्दिक ऐश्वर्याकडे पहावे इतका सूक्ष्मात जाऊन सूक्ष्म विचार अध्यात्मिक तत्वज्ञानाच्या क्षेत्रामध्ये झाला. पण त्याच भारताला संपूर्णपणे ऐहिक असे जे जीवन आहे त्या जीवनात समृध्दता यावी, सुरक्षितता यावी, शाश्वतता यावी, प्रगतीची शाश्वती मिळेल, विकासाची शाश्वती मिळेल या तऱ्हेने कोणता राजकीय विचार प्रस्तुत करावा त्यासंबंधीचा तत्वज्ञानाच्या पातळीवरती विचार फारच कमी झाला. जो झाला तो महाभारताच्या शांतीपर्वामध्ये आणि तिथेही काहीसा कल्पनारम्य स्वप्नरंजीत असाच विचार झाला. महाभारताच्या शांतीपर्वामध्ये आदर्श राज्य संस्थेची अवस्था वर्णन केलेली

आहे. ती अशी आहे. आदर्श असा जो समाज असेल त्या समाजामध्ये राजा नसेल, राजदंड नसेल. शासन कोणाला होत नसेल. नियम नसतील पण प्रत्येक नागरिक स्वेच्छेने आपली कर्तव्ये पार पाडील आणि दुसऱ्या नागरिकाबद्दलचे आपले जे कर्तव्य आहे ते सर्व माणसे न सांगता, जबरदस्ती न करता आपणहून करतील हा शांतीपर्वाचा आदर्श आहे. म्हणजे त्याच्यामध्ये नागरिकांचा परस्पर कर्तव्याचा विचार आहे. सामाजिक सुरक्षिततेचा विचार आहे. या एकमेकांच्याबद्दलच्या कर्तव्य भावनेने प्रेरित झालेले नागरिक स्वयंस्फूर्तीने संरक्षण आणि परस्परांना मदत करतील. पण ही जी आदर्श अवस्था आहे. ती कधी येईल का नाही ! आणि जर ती येणार नसेल आणि काही माणसे तरी या आदर्श अवस्थेला कधीच पोहोचू शकणार नाहीत. ती नेहमी त्यावेळेला कमी पडणार अशी जर खुजी राहणार असली तर राज्यसंस्थेची गरज पडणारच आहे. मग या राज्यसंस्थेची कामे काय राहतील. या राज्यसंस्थेचे स्वरूप काय असेल. या संबंधीचा विचार हा प्राचीन भारतीय तत्वज्ञानाच्यामध्ये अतिशय कमी झाला. आणि झाला तो मी म्हटलं तसं. कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्ये राज्यकारभारासंबंधी झाला. राज्यसंस्थेसंबंधी झाला नाही. त्याचा एक परिणाम असा झाला की, वर्णव्यवस्था जोपर्यंत शाबूत होती. भक्कम होती आणि माणसाचे आयुष्यामधले स्थान आणि त्या स्थानाबरोबर येणारी कर्तव्ये आणि अधिकार हे जोपर्यंत वर्णव्यवस्थेप्रमाणे ठरत होते. तोपर्यंत त्याला आणखी राजाच्या हस्तक्षेपाची फारशी गरजही नसायची. चातुर्वर्ण व्यवस्था जोपर्यंत भक्कम होती. तोपर्यंत जन्मसिध्द आणि कर्मविपाकाने जन्म मिळायचा. ठरलेल्या वर्णव्यवस्थेमध्ये, ठरलेल्या जातीमध्ये आणि ज्या जातीत जन्म झाला त्या जातीनुसार हक्कही ठरायचे, कर्तव्येही ठरायची आणि ही सर्वांनी मान्य केलेली हक्क आणि कर्तव्ये असल्याकारणाने कुणीही दुसऱ्याच्या वाटेवर जाऊन त्याच्या हक्कावर बळजबरी करणे

किंवा त्याची नसलेली कर्तव्ये त्याच्यावरती लादणे हेही फारसे होत नसे आणि त्याच्यामुळे काल मी म्हटलं की स्वाऱ्या आल्या नि गेल्या. साम्राज्ये उदयाला आली आणि अस्ताला गेली. टोळधाड यावी तशा सैनिकानी या टोकापासून या भारतवर्षाच्या दुसऱ्या टोकापर्यंत स्वाऱ्या करून मुलुखगिरी केली पण सर्वसामान्य माणसाच्या जीवनामध्ये तात्पुरती जी काही वळवळ पृष्ठभागावरती झाली तेवढीच. ती चलबिचल सोडली तर शेकडो वर्षे हे असेच चालले. त्याच्यामुळे भारतीय समाजामध्ये मध्यवर्ती राजकीय केंद्र असे कधी निर्माण होऊ शकले नाही. मध्यवर्ती राजकीय केंद्र की ज्या केंद्रामधून हुकूम निघतो आणि त्या आज्ञेचे पालन होते. " Political Centre " असे निर्माण झाले नाही. बहुसंख्य लोकांचा धर्म एक असल्या कारणाने आणि इतर धर्मातले बहुसंख्य लोक हिंदू धर्मातून धर्मांतर करूनच गेलेले असल्याकारणाने सांस्कृतिक विचारांचा पाया जवळ जवळ सगळ्या धर्मामध्ये पसरला. परंतु धर्मातीत जातीव्यवस्थेपलिकडचा सर्वांना आपलासा वाटणारा असा एक राजकीय केंद्रासंबंधीचा, आत्मभावनेचा भाग निर्माण होऊ शकला नाही. जो स्वातंत्र्यानंतर करावा लागत आहे. आणि हे काम कधी सामोपचाराने तर कधी जबरदस्तीने शासनाला करावे लागत आहे हा एक भाग झाला. "The Failure of ancient India to create a Political Centre " दुसरा भाग असा आहे की, भारत हा परंपरानिष्ठ समाज असल्याकारणाने आणि लोकशाही ही आधुनिक संकल्पना असल्याकारणाने भारतामध्ये लोकशाही यशस्वी होण्याची शक्यता कमी आहे, असा काही अभ्यासकांचा विचार आहे. समाज शास्त्राच्या अभ्यासकांमध्ये असा विचार रूढ होतो आहे की, परंपरा आणि नवता, परंपरा आणि आधुनिकता ही दोन टोकं नसून ती एक रेषा आहे आणि कुठलाही समाज या टोकाला किंवा त्या टोकाला असत नाही. तर ही दोन टोके जोडणारी जी रेघ आहे त्या रेघेवरती कुठेतरी असतो. कधी

परंपरेच्याजवळ असतो तर कधी नवतेच्या किंवा आधुनिकतेच्या जवळ असतो. त्याहूनही अधिक शास्त्रशुध्द विधान करायचे तर प्रत्येक समाज काही क्षेत्रामध्ये परंपरेच्या जवळ असतो. आणि त्याचवेळी इतर काही क्षेत्रात आधुनिकतेच्या जवळ असतो. घरामध्ये नवा टी.व्ही. आणला की पहिल्यांदा लोक त्याला हळदकुंकू वाहतात. मोटारगाडी घेतली की त्याला कुंकू लावतात. मला तर मुंबईमध्ये एका महाविद्यालयामध्ये त्यांनी नवा कॉम्प्युटर घेतला तेव्हा त्याच्या उद्‌घाटनासाठी बोलावले आणि त्या उद्‌घाटनाच्या वेळेला त्यांनी मला आधी त्याला कुंकू लावा म्हणून सांगितले. मी म्हटले लावणार नाही. प्रत्येक समाज शेवटी आपले जीवन कमीत कमी विरोधी करण्यासाठी आपल्याला ज्या विरोधी वाटतात अशा गोष्टींची सांगड घालत असतो. आपण आधुनिक उपकरणे वापरतो पण आपले मन काही पुरेसे आधुनिक झालेले नसते. कुठेतरी पूर्वीचे संस्कार आपल्यावरती असतात आणि त्याच्यामुळे आपण त्यांची सांगड घालतो. कुठल्याही संस्कृतीत असेच होते आणि मग त्या परंपरेची म्हणून काहीतरी एक शक्ती एक ताकद निर्माण होते. नाही तरी संपूर्णपणे इलेक्ट्रॉनिक्सवर चालणारे जहाज ज्यावेळी त्याचे अनावरण करतात त्यावेळी पाश्चात्य देशात शँपिनची बाटली फोडतात आणि आपण नारळ फोडतो म्हणजे ते करत नाहीत, आपणच करतो असे नव्हे.

प्रत्येक माणसाला कुठेतरी अशी जीवनामध्ये जुन्याची आणि नव्याची सांगड घालून आपले जीवन अधिक सुसह्य करावेसे वाटते. नाहीतर जुन्यानव्याचा हा संघर्ष वैचारिक आणि वर्तनाच्या पातळीवर त्याला पेलणार नाही इतका प्रचंड आहे आणि म्हणून भारतीय राजकारणाचा अभ्यास करताना भारतीय समाज परंपरानिष्ठ आहे असे ढोबळ विधान करून चालणार नाही. तो आधुनिक बनलेला नाही हे मान्य करायला तर

काही कोणाचीच हरकत नाही तर परंपरेपैकी काही जपण्याचा प्रयत्न करणारा पण आधुनिकतेकडे प्रवास करणारा असा हा समाज आहे. आणि त्या परंपरेपैकी काही जतन करण्याचा त्याचा जो प्रयत्न आहे. आधुनिकतेकडे चाललेल्या प्रवासात उपयोगी पडेल म्हणून त्यांनी आपल्याबरोबर जे सांस्कृतिक पाथेय घेतलेले आहे, गाठोडे घेतलेले आहे परंपरेचे. त्यातल्या ज्या वस्तू आहेत त्यातल्या प्रवासात कोणत्या उपयोगी पडतील, कोणत्यांची अडचण होणार आहे याच्यासंबंधीचा निर्णय होत नाही म्हणून समाजजीवनामध्ये हे संघर्ष निर्माण झालेले आहेत. कोणाला वाटते हिंदु परंपरेचे गाठोडे आपल्याबरोबर घेतल्याशिवाय भारताचे भारतीयत्व शिल्लक राहणार नाही. काहींना असे वाटते की, तसे नाही. वेगवेगळ्या धर्माचे बनलेले हे जे राष्ट्र आहे त्यामध्ये जर सर्वांना बरोबर घेऊन जायचं असेल तर धर्म ही वैयक्तिक जीवनापुरती मर्यादित बाब ठेवली पाहिजे. सार्वजनिक आणि राजकीय वर्तनाचा पाया धर्माला करता कामा नये असा दुसरा विचार मांडला जातो आहे. मग हा कशाचा विचार आहे ? शेवटी आपण आधुनिकतेकडे जाण्यासाठी सुरू केलेल्या प्रवासात परंपरेतले नेमके काय उपयोगी पडेल आणि काय उपयोगी पडणार नाही. याच्यासंबंधी चाललेल्या वादंगाचा हा भाग आहे. स्वातंत्र्यलढा ज्यावेळी चालू होता त्यावेळच्या भारतीय राष्ट्रवादामध्ये हेच होतं. मग टिळकांना सार्वजनिक गणेशोत्सवाची कल्पना सुचते. महात्मा गांधींना रामराज्य संकल्पना सुचते. राजकीय पुढाऱ्याला कुठेतरी आपला सांधा भूतकाळाशी जोडावा लागतो. असे करणे हे अपरिहार्य असते आणि राजकारणाचे स्वरूप हे त्याच्यामधूनच ठरत असते. म्हणून राजकारणाचा अभ्यास करायचा. त्यावेळेला राष्ट्रवादी का यशस्वी झाले आणि बुध्दिवादी नेमस्त का झाले नाहीत, हा प्रश्न विचारात घेतला पाहिजे. ज्या नेमस्तांना आपल्या जुन्या समाजातले काहीच पटत नव्हते. ' जुने जाऊ द्या मरणा

लागूनी " असे म्हणून नवतेची तुतारी पुकारणारे जे लोक होते ते काही प्रामाणिक नव्हते असे नाही. ते राष्ट्रभक्त नव्हते असे नाही. परंतु त्यांना समाजाचा पाठिंबा न मिळण्याचे कारण समाजाला परंपरा आणि आधुनिकता यांची सांगड घालून देणारा विचार हवा होता आणि तो आधुनिक राष्ट्रवादाने मिळाला. टिळकांच्यामुळे त्याला फार मोठा व्यापक पाया मिळाला. गांधींनी तो त्यांच्याही पुढे नेवून शेतकऱ्यांच्यापर्यंत पोहोचविला.

साहजिकच शेतकऱ्याच्या मनाची ही जी धडपड परंपरा आणि नवता दोन्ही जपण्याची आणि टिकविण्याची होती. त्याचेही प्रतिबिंब भारतीय स्वातंत्र्यलढ्यात पडले आणि स्वातंत्र्यलढ्यानंतर जी आपण राष्ट्राची उभारणी करतो आहोत. त्याच्यामध्ये हे पडलेले आहे म्हणून आधुनिकीकरण म्हणजे सर्व जुन्या गोष्टीचा त्याग असे नव्हे, तर त्याचे परिशीलन करून कोणत्या जुन्या गोष्टी त्याज्य आणि कोणत्या जुन्या स्वीकारार्ह याचा निर्णय हा राजकारणातला एक महत्त्वाचा भाग आहे. परंपरा आणि नवतेमधील या तडजोडी भारतीय माणूस आपल्या विशिष्ट पध्दतीने करतो आहे. त्याच्यामुळे त्याच्या राजकारणाला वेगळेपण आलेले आहे. हिंदू धर्माचे प्राबल्य ही भारतीय समाजातली सर्वात महत्त्वाची वस्तुस्थिती आहे. ती कोणालाही नाकारता येणार नाही. लोकसंख्येच्या ब्याऐंशी टक्के लोक जर हिंदू आहेत तर ही वस्तुस्थिती कशी नाकारता येईल ? म्हणून या देशाची राज्यघटना तयार होत असताना धर्माचे आणि राज्यसंस्थेच्या संबंधांचे स्वरूप काय राहील याच्यावरती वाद झाला आणि शेवटी धर्मनिरपेक्ष राज्यसंस्थेचा निर्णय घटनाकारानी घेतला. नुसते ब्याऐंशी टक्के हिंदू आहेत एवढे नव्हे तर इतर धर्मामध्ये हिंदू धर्मातले धर्मांतरित असे लोक असल्याकारणाने त्यांनी जरी धर्म बदलला तरी आपल्याबरोबर

जाताना अनेक हिंदू संस्कारांचे गाठोडे आपल्याबरोबर नेलेले आहे. संस्कृतीचे जे वातावरण आहे ते प्रामुख्याने हिंदू आहे. याचा उपयोग राजकारणात विधायक दृष्टीने करता येण्यासारखा आहे आणि विध्वंसकदृष्टीनेही करता येण्यासारखा आहे. म्हणून राजकारणातले वेगवेगळे राजकीय पक्ष किंवा वेगवेगळ्या शक्ती त्याचा कसा उपयोग करत आहेत हा देखील भारताच्या राजकारणाच्या अभ्यासाचा एक मार्ग आहे. या धार्मिक वस्तुस्थितीचा विधायक उपयोग करण्यासाठी घटनेत कोणती कलमे आली आणि मतांचे राजकारण कसे चालते. त्यात सुसंगती आहे की विसंगती आहे. विघातक आणि विध्वसंक कार्याकरिता या भावना कोण चेतवतो आहे. त्यासाठी ते काय करतात. हा सगळा भारतीय राजकारणाच्या अभ्यासातला एक भाग आहे. जाती संस्था, चातुर्वर्ण व्यवस्था हा हिंदू समाजाच्या समाजरचनेचा पाया आहे. परंतु गेल्या पाच पन्नास वर्षामध्ये जातीचे स्वरूप खूपसे बदलत चाललेले आहे. आपण बऱ्याच वेळेला म्हणतो की, भारतातले राजकारण जातीनिष्ठ आहे आणि जातींचा प्रभाव राजकारणावरती पडतो हे खरेच आहे. पण राजकारणाच्या प्रक्रियेमुळे जाती आणि त्यांचे कार्य यांच्यामध्येही बदल होत चालला आहे. याच्याकडेही लक्ष पुरवणे आवश्यक आहे. आणि त्यांचे संबंध एक दिशा मार्गासारखे नसून Inter Penetration चे त्यांचे संबंध आहेत. जातीमुळे राजकारणाचे स्वरूप निश्चित होते. राजकारणामुळे जातीचे स्वरूप बदलत आहे. अस्पृश्यता हा विचार मागे पडला. जातीनिहाय व्यवसाय हा विचार मागे पडला. पण एक सामाजिक संघटनेची बाब म्हणून, एकत्र येण्याची बाब म्हणून जातीना महत्व आले. कारण लोकशाही राजकारणामध्ये संख्येला महत्व असते ना ? Democratic Politics is a Politics of number. शेवटी संख्येचे राजकारण असते ते, म्हणून तर एक्कावन्नांचे राज्य होते आणि एकूण

पन्नास टक्क्यांना विरोधी भूमिका घ्यावी लागते आणि आपण एक्कावन्न टक्के कसे होऊ यासाठी धडपड करायची असते. त्यामुळे आज जातींची जी परंपरागत कार्ये होती. उदा. व्यवसाय निश्चिती करणे ते मागे पडले. व्यक्तीचे सामाजिक जीवनामधले स्थान निश्चित करणे हे मागे पडले. रोटी व्यवहार त्या विशिष्ट गटापुरता मर्यादित राहणे मागे पडले. बेटी व्यवहार तेवढ्या मोठ्या प्रमाणावर होत नाहीत. पण आधुनिकतेच्या परिणामांमुळे आपला समाज जो ढवळून निघतो आहे. तसा तो आणखी पांच पंचवीस वर्षे ढवळून निघाला तर बेटी व्यवहार जाती जातीत मोठ्या प्रमाणावरती व्हावयाला लागतील त्याबद्दल मला मुळीच शंका नाही.

तरीदेखील लोक जातीच्या राजकीय भूमिकेवरती एकत्र राहणार आणि आपल्यासारख्या इतर जातींच्याबरोबर व्यापक ऐक्य करून त्या संख्येच्या दडपणाच्या साहाय्याने राज्यसंस्थेला तिची धोरणे आपल्याला अनुकूल करून घेण्यासाठी प्रयत्नशील राहणारच. आता प्रत्येक जातीपेक्षा जाती समूहांचा विचार आपण करतो. Not individual caste but constellation of caste groups याचा विचार करतो. ज्या जाती अशी फेडरेशन्स करू .लागल्या व एकमेकांशी देवाण-घेवाण करू लागल्या आणि जास्तीत जास्त आपल्या मतांची ताकद, संख्येची ताकद आपल्यासमोर उभी करून राज्य संस्थेला तिची सार्वजनिक धोरणे आपल्याला अधिक अनुकूल करून घेण्यासाठी प्रयत्नशील होऊ लागल्या. त्या राजकारणात वरचढ ठरल्या. भारतीय राजकारणाचा ज्यांना खोलांत जाऊन अभ्यास करायचा आहे त्यांना ही एक आणखी दिशा आहे. त्यांनी गेल्या पन्नास वर्षामध्ये जाती संस्थेत आणि जातींच्या राजकीय वर्तनामध्ये होत असलेले फरक बारकाईने पाहिले पाहिजेत. हे राष्ट्रीय पातळीवर समजणारच नाहीत कारण सुदैवाने किंवा दुर्दैवाने जाती राष्ट्रीय नाहीत. जाती राज्याच्या सरहद्दीपर्यंत

थंबतात. प्रामुख्याने पंचक्रोशीपर्यंतच ती मर्यादित असते. ब्राह्मण काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत असले तरी त्यांचे एकमेकांशी सोयरसूतक नाही. त्यामुळे काश्मिरमधल्या ब्राह्मणाला बंगालमधल्या भद्र लोकांबद्दल किंवा महाराष्ट्रातल्या, गुजराथमधल्या आणि तामिळनाडूमधल्या ब्राह्मणांना एकमेकांबद्दल आत्मियता वाटत नाही. वाटण्याचे काहीही कारण नाही. म्हणून जातींचा विचार राष्ट्रीय पातळीवरती न करता मायक्रोलेव्हलवर म्हणजे सूक्ष्मपातळीवरती गावांच्या, पंचक्रोशीच्या फार तर जिल्ह्याच्या आणि क्वचितप्रसंगी त्याचा राज्यव्यापी संदर्भ लक्षात घेऊन जर केला तर राजकारणाच्या स्वरूपाबद्दल, राजकारणातल्या प्रवाहांबद्दल प्रचंड माहिती आपल्याला मिळेल. इतकेच नव्हे तर त्यासंबंधी पाहण्याचा एक इतका मूलगामी दृष्टिकोन आपल्याला मिळेल. भारतीय राजकारण आपल्याला अधिक यथार्थतेने समजू लागेल.

धर्म आणि जाती ज्याप्रमाणे अनेक आहेत त्याचप्रमाणे भाषा अनेक आहेत. आणि भाषांचे राजकारण हा ही एक राजकारणाचा सखोल अभ्यासाचा विषय आहे. एका वेळेला होता आणि आजही करता येण्यासारखा आहे. भारताच्या राज्यघटनेतच पंधरा भाषा, अधिकृत भाषा म्हणून ऑफिशियल लँग्वेजेस म्हणून स्वीकारलेल्या आहेत. आठशे सत्तर इतर बोली जनगणनेमध्ये नमूद केलेल्या आहेत आणि त्याच्याही खाली आणखी बारीक सारीक बोली बोलल्या जातात. दहा हजार लोकांपेक्षा कमी बोलणाऱ्या बोली घेतल्यातर अठराशे बाहत्तरच्यावर बोली होतात. त्यामुळे आपल्याला असे वाटते की, हे जाती-भाषांचे जंगलच आहे की काय ? परंतु सुर्दैवाने त्याच्यात एक परिस्थिती अशी आहे की बहात्तर टक्के लोकांची भाषा ही संस्कृतोद्भव आहे. हिंदी- बंगाली- मराठी - गुजराथी - राजस्थानी संस्कृतोद्भव असल्यामुळे लिपीच्या फरकांमुळे जरी

एकमेकांच्यामधले दळणवळण नाहीसे झाले असले किंवा मर्यादित असले तरी त्यांच्यामध्ये काहीतरी साम्य आहे. साडेतेवीस टक्क्यांच्या द्रविड भाषा आहेत. तेलगू, कन्नड, मल्याळम् आणि तामिळ आणि या जरी सर्वस्वी भिन्न भाषा असल्या तरी द्रविड भाषांपैकी तामिळभाषिक सोडले तर इतरांचा हिंदीला किंवा संस्कृतोद्‌भव भाषेला विरोध नाही. आंध्र प्रदेशात हिंदीविरोधी चळवळ नाही. केरळामध्ये हिंदीविरोधी चळवळ नाही. कन्नडमध्ये हिंदीविरोधी चळवळ नाही आणि तामिळनाडूमधलीही परिस्थिती गेल्या काही वर्षात इतकी बदललेली आहे की दोन वर्षापूर्वी तिथल्या द्रमुक सरकारने जेव्हा हिंदी विरोधाच्या भावनेला चेतविण्याचा प्रयत्न केला त्यावेळी आठ दिवसांमध्ये ते आंदोलन बारगळले.

काही वेळेला आणि विशेषत: जेव्हा बाहेरचे अभ्यासक भारतीय राजकारणाचा अभ्यास करायला येतात. त्यांना या परिस्थितीची बारीक-सारिक माहिती नसल्याकारणाने एखाद्या दुसऱ्या प्रश्नावर आंदोलन झाल्यावर त्यांना असे वाटते की आता भारत फुटणार, भारताचे ऐक्य हे अगदी तकलादू आहे. तुम्हाला आठवत असेल की भाषावार प्रांत रचनेसाठी ज्यावेळी सर्व प्रांतामध्ये चळवळी चालू होत्या त्यावेळेला दिल्लीला ' वॉशिंग्टंन पोस्ट ' या दैनिकाचे वृत्तप्रतिनिधी म्हणून असलेले सेलिग हॅरिसन यांनी " India : The Most Dangerous Decades " म्हणून पुस्तक लिहिलेले आहे आणि त्यामध्ये त्यांनी असे भविष्य वर्तवून टाकले की, भाषेच्या प्रश्नावरती भारत निदान दहा-बारा तुकड्यामध्ये विभागला जाणार ! सहासष्ट साली त्यांचे पुस्तक प्रसिध्द झाले. त्यानंतरच्या काळामध्ये भाषिकवाद मिटलेले दिसतात. फोफावलेले दिसत नाहीत. प्रत्येक निवडणूक ही काही पाश्चात्य अभ्यासकांना शेवटची निवडणूक वाटत आलेली आहे. १९६७ साली मँचेस्टर गार्डियनचे नेव्हील

मॅक्सवेल यांनी हिंदुस्थानात येऊन प्रचार पाहून असे भविष्यच मुळी वर्तवले ते हे की, भारताची बहुधा ही शेवटचीच सार्वत्रिक निवडणूक आहे त्यानंतरची एक्काहत्तरची झाली, सत्त्याहत्तरची झाली, त्यानंतर ऐंशीची झाली, चौऱ्यांशीची लोकसभा झाली, आता परवा एकोणनव्वदची लोकसभा झाली. काय निवडणूका अजून शेवटच्या वगैरे झालेल्या नाहीत. या संदर्भात एका अभ्यासकाचे वाक्य मला अर्थपूर्ण वाटते. तो म्हणतो, " भारताचे हे दुर्दैव आहे की, त्याला काही भविष्य नाही, असे भविष्यवाणी वर्तविणाऱ्या ज्योतिषांना तो आकर्षित करतो पण भारताचे यश यात आहे की, अशा ज्योतिषांना तो पुन्हा पुन्हा खोटे पाडतो. " भारतीय राजकारणाचा सामाजिक संदर्भामध्ये जर विचार केला तर मग त्यातल्या फुटीर शक्ती आणि त्यातल्या ऐक्य साधणाऱ्या शक्ती या दोघांचे यथार्थ ज्ञान होते आणि अतिशयोक्त अशा प्रकारचा दृष्टिकोण घेतला जात नाही.

राजकीय विकास म्हणजे लोकांचा सहभाग आणि राजकीय संस्थांचे जाळे यांच्या क्रिया-प्रतिक्रियांचे समीकरण असा जर असेल तर सहभागाची कल्पना मी दिली. आता राजकीय संस्थांच्याकडे वळणे आवश्यक आहे. आपण ज्या राजकीय संस्था निर्माण केल्या आहेत त्या कितपत भक्कम आहेत त्याचा विचार केला म्हणजे मग अभ्यासाची संपूर्ण दिशा आपल्यापुढे ठेवल्यासारखी होईल. प्रशासन दिल्लीपासून गल्लीपर्यंत व्यवस्थित व्हावे यासाठी वेगवेगळ्या राजकीय संस्था आपण हेतूतः निर्माण केलेल्या आहेत. आपले संविधान त्यातले एक आहे. त्या संविधानाने मुद्दामच भारताला संघराज्याचे रूप दिले. कारण हा देश बहुरूपी आहे आणि एक केंद्रानुवर्ती राज्य घटनेमध्ये या देशाची विविध रूपे सामावली जाणार नाहीत म्हणून घटना समितीने भारत हे संघराज्य राहील असा

निर्णय घेतला. यामध्ये केंद्राचे अधिकार कोणते ते निश्चित केले. राज्यांचे अधिकार निश्चित केले आणि दोघांचे काही समान अधिकार असेही घटनेमध्ये नमूद केले. त्या राज्य घटनेची अजूनपर्यंत तरी व्यवस्थित अंमलबजावणी चालू आहे. हा जमेचा भाग झाला. त्याच्यामध्ये आपण अनेक दुरुस्त्या केल्या आहेत कारण आपण एका परिवर्तनशील अशा काळामधून जातो आहोत. आणि त्यामुळे घटनेमधले दोष आणि उणिवा दूर करण्यासाठी अनेक प्रकारच्या घटना दुरुस्तीचे कायदे करावे लागले आहेत. पण स्थूलमानाने घटनेने निर्माण केलेली जी चौकट आहे ती संघ राज्याची असून केंद्र आणि राज्ये दोन्ही आपापल्या अधिकारक्षेत्रात स्वतंत्र व सार्वभौम आहेत. संसद आहे तशी राज्यस्तरावर विधिमंडळ आहेत आणि त्यांच्या दर पाच वर्षांनी कधी त्याहूनही लवकर निवडणुका होतात. न्याय संस्था आहेत आणि अजून तरी बऱ्याच प्रमाणामध्ये नि:पक्षपाती, स्वतंत्र आणि निर्भिड असे न्यायदान निदान उच्च न्यायालये तरी करतात असे आपल्याला म्हणता येईल.

हा सगळा संस्थात्मक जो सांगाडा आहे, हा जर नीट चालायचा असेल तर त्याला महत्त्वाची अशा प्रकारची राजकीय संस्था म्हणजे पक्ष पध्दती. त्यामध्ये आपल्याला दुर्दैवाने गेल्या चाळीस वर्षात फारसे यश लाभले नाही. ज्या तऱ्हेची पक्ष पध्दती इथे स्थिरावेल असे वाटले होते तशा प्रकारची पक्षपध्दती काही स्थिरावली नाही. घटनाकारांची तशी आशा होती कारण प्रामुख्याने त्यांच्या डोळ्यासमोर जो आदर्श होता तो इंग्लंडमधल्या लोकशाहीचा होता. आणि इंग्लंडमध्ये प्रामुख्याने दोन पक्ष आहेत. आणि सत्तापालट आलटून पालटून हुजूर पक्षाकडे नाहीतर मजूर पक्षाकडे, मजूर पक्षाकडून पुन्हा हुजूर पक्षाकडे अशा प्रकारे शांततेने कायदेशीर पध्दतीने सुव्यवस्थित असा सत्तापालट दोनच पक्षांमध्ये होतोय. त्याप्रमाणेच

आपल्या घटनाकारांना असे वाटले की, कालांतराने इथे पण भारतीय लोकशाहीचा रथ दोन पक्षांच्या चाकावरती स्थिरावेल. आणि पुढे जायला लागेल. आता हा आशावाद व्यवहार्य होता की, अव्यवहार्य होता हा विचार करण्यासारखा भाग आहे. मला असे वाटते की, तो बराचसा अव्यवहारी होता. आणि भारतीय घटनाकारांनी ब्रिटिश लोकशाहीचा जेवढा सखोल अभ्यास केला होता आणि तिचा अनुभव घेतला होता तेवढा विचार युरोपमधल्या इतर देशांच्या पक्ष पध्दतींचा केला नव्हता. त्याचबरोबर या देशातला जो समाज आहे त्या समाजाच्या बहुरंगी रूपाचा जेवढा गंभीरपणे विचार करायला हवा होता तेवढा केलेला नव्हता. असे निदान आता पाठीमागे वळून पाहिल्यावरती वाटते. हा देश इतका अठरा पगड आहे. जगाच्या पाठीवरती असेल तेवढी सगळ्या प्रकारची विविधता या देशामध्ये आहे. की या इतक्या वैविध्याने परिपूर्ण असलेल्या समाजामध्ये समाजमन एकतर अ पक्षात नाहीतर ब पक्षात प्रतिबिंबित होईल या अशा वादाला ऐतिहासिक आणि व्यवहारिक आधार नाही. जॉर्ज बर्नार्ड शॉनी समाजवादाच्या संदर्भात म्हटले होते की, सगळा समाजवादी समाज पार्लमेंटमध्ये कायदे करून आपल्याला जन्माला घालता येईल असे मानणे म्हणजे जीवनाचा महासागर संसदेच्या प्याल्यामध्ये ओतता येईल अशी कल्पना करण्यासारखी आहे. दुथडी भरून वाहणारे हे जे जीवन आहे ते असं संसदेच्या टिनपाटामध्ये बसणार नाही. तसा हा भारतीय समाज विविध आहे, वर्धिष्णू आहे आणि त्याचा जसजसा विकास होईल तसतसे त्याच्यातले वैविध्य वाढत जात आहे. असा हा सगळा वैविध्यपूर्ण समाज दोन पक्षांच्या मार्फतच प्रतिबिंबीत होईल या आशेला मी म्हटले तसा ऐतिहासिक, व्यावहारिक किंवा तात्विक आधार नव्हता. म्हणून आपण जी निवडणूक पध्दत स्वीकारली त्या निवडणूक पध्दतीने अन्य देशामध्ये जरी कालांतराने द्विपक्ष पध्दतीचा उगम झाला. निदान व्हायला

मदत झाली तसा आपल्याकडे चाळीस वर्षे आणि नऊ सार्वत्रिक निवडणुका होऊनही पक्षांची संख्या कमी कमी होत चालली आहे. आणि द्विपक्ष पध्दतीकडे आपला प्रवास चालू आहे. असे म्हणण्यासारखी परिस्थिती अजिबात झालेली नाही. उलट पावसाळा आला की छत्र्या उगवतात त्याप्रमाणे निवडणुका आल्या की पक्षांच्या राहुट्या उभ्या राहतात. निवडणूक पध्दतीच्यामुळे पक्षांच्या संख्येमध्ये घट होईल हा आशावाद फोल ठरलेला आहे.

पुढे जाऊन मी असेही म्हणेन की, द्विपक्ष पध्दती असल्याशिवाय स्थिर सरकार मिळत नाही हाही एक भ्रम आहे. बहुपक्ष पध्दती असली तरी देखील जर त्या पक्षांचे परस्परांशी असलेले संबंध सलोख्याचे असले, मतैक्याचे क्षेत्र आणि मतभेदाचे क्षेत्र हे जर त्यानी आपापसामध्ये स्पष्ट करून विभागून घेतलेले असले आणि त्याच्या मर्यादेत त्यांचे राजकीय व्यवहार होत राहिले तर बहुपक्ष पध्दतीमध्ये ही संयुक्त सरकारे स्थिरावू शकतात. एकाच संयुक्त सरकारने म्हणजे दोन-तीन पक्षांच्या संयुक्त सरकारने पंचवीस - पंचवीस वर्षाचा कालखंड निर्वेधपणे पार केलेला आहे. असे आपल्याला युरोपातल्या काही देशांमध्ये दिसून येते. म्हणून आपल्याला भारतीय राजकारणामधल्या ऐक्याच्या शक्ती आणि विघटनाच्या शक्तींचा विचार निवडणुकीच्या संदर्भातही करता येईल. आपली विद्यमान निवडणूक पध्दती जी आहे तिची पक्ष पध्दती सुधारायला काही मदत झालेली नाही. अर्थात असा कोणी आक्षेप घेऊ शकेल की, आदर्श निवडणूक पध्दती आणली की लगेच आदर्श पक्ष पध्दती त्याच्यातून अपरिहार्यपणे जन्म घेते का ? नाही. कारण पक्षदेखील समाज जीवनातूनच मूळ धरून वर येत असतात. त्याच्यामुळे निवडणूकपध्दत कितीही आदर्श केली तरी तेवढ्यावरून आदर्श राजकीय पक्षपध्दतीचा

उदय आपल्याला घडवून आणता येईल हे खरे नाही. पण काही प्रमाणात तरी निवडणूक आणि पक्ष यांचे परस्पर संबंध असल्याकारणाने इष्ट अशा प्रकारची पक्षपध्दती निर्माण करण्याला, ती भक्कम करण्याला निवडणूक पध्दतीचा उपयोग होऊ शकतो. ती सहाय्यभूत होऊ शकते. आणि त्यादृष्टीने निवडणूक पध्दतीमध्ये अनेक प्रकारचे बदल करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. त्याच्या तपशीलात मी जाणार नाही. कारण तो एक स्वतंत्र विषय होईल. भारतीय राजकारणाच्या अभ्यासाची ती एक दिशा आहेच. पण मग तो अधिक खोलात जाऊन स्वतंत्रपणे मांडण्यासारखा विषय आहे. मुंबईमध्ये मी परवा १२ तारखेला यशवंतरावांच्या जयंतीच्या दिवशी हा विषय मांडलेला आहे. पण मला त्याच्यामध्ये जे प्रमुख दोष दिसतात तेवढ्याचे दिग्दर्शन करतो. त्याच्या अनुषंगाने जरी तुम्ही आणखी खोलात अभ्यासाला लागलात तरी भारतीय राजकारण आणि पक्षपध्दती आणि निवडणूका यांच्या संदर्भाबद्दल आपणाला काही यथार्थ आणि सखोल असे ज्ञान त्याच्यामधून होऊ शकेल.

पहिला दोष असा की, सध्याच्या निवडणूक पध्दतीतून द्विपक्ष पध्दती निर्माण होण्याची सुतराम शक्यता दिसत नाही. तशी ती दिसत नाही म्हणून मी खंत करतो अशातलाही भाग नाही. कारण मी आताच आपल्याला सांगितले की हा देश इतका विविधतेने नटलेला आहे की, या सगळ्या विविध जीवनाचे दर्शन दोन पक्षांच्यामार्फतच झाले पाहिजे असे काही नाही आणि जर ते झालेच तर समाजाची सगळी विविधरंगी रूपे त्या पक्षांच्यामध्ये येणार, जसे काँग्रेसमध्ये आले. काँग्रेस ही सर्वात जास्त प्रातिनिधिक झाली त्याचे कारण काँग्रेसने आपल्या स्वातंत्र्यलढ्याच्या काळापासून समाजातल्या सर्व विचारांना, सर्व हितसंबंधांना सामावून घेतले. काँग्रेस पक्ष ही आतापर्यंत एखाद्या उघड्या छत्रीसारखी संघटना

आहे. बाहेर ऊन तापायला लागले, किंवा अनपेक्षितपणे वर्षाधारा सुरू झाल्या म्हणजे आपण ज्या प्रमाणे छत्रीच्या आश्रयाला जातो त्याचप्रमाणे वेगवेगळे गट हे आपल्या हेतूपूर्तीसाठी आपल्या हितसंबंधाच्या रक्षणासाठी काँग्रेसच्या छत्रीच्याखाली जमा झाले. त्यामुळेच काँग्रेस एखाद्या विशिष्ट गटाची न बनता प्रातिनिधिक आणि सर्वसमावेशक अशी राष्ट्रव्यापी संघटना झाली. आणि इंदिरा गांधींच्या कारकिर्दीमध्ये जे घडले ते जर इंदिराजींनी टाळले असते तर काँग्रेसचे हे सर्वसमावेशक प्रातिनिधिक स्वरूप आजपर्यंतही टिकवता आले असते. अजून ही संधी गेलेली आहे असे नाही. काँग्रेसमध्ये आत्मपरिक्षणाची गरज आहे. अंतर्मुख होण्याची गरज आहे. आणि तसा प्रयत्न जर त्यांनी केला तर काँग्रेसला पुन्हा एकदा अधिक व्यापक, अधिक प्रातिनिधिक अशा स्वरूपाचे रूप धारण करणे अशक्य आहे असे नाही. काँग्रेसला जर दुसरा एकच तुल्यबळ पक्ष विरोधामध्ये उभा करावयाचा असेल तर त्यालाही जवळ जवळ काँग्रेससारखेच सर्वसमावेशक स्वरूप धारण करावे लागेल. आजचा जो राज्यकर्ता पक्ष आहे. जनता दल, त्या जनता दलाला दुसरी काँग्रेस असे नाही का म्हणता येणार ? निदान त्या प्रक्रियेमध्ये असलेले काँग्रेसमधले सगळे बरे वाईट झपाट्याने आत्मसात करणारे की जनता दल असाच जर कारभार करू लागले तर दोन - चार वर्षाच्या आत प्रति काँग्रेसच उभी राहिल्यासारखी वाटेल. जर व्यापक देशव्यापी पाठिंबा मिळवावयाचा असेल तर तशा प्रकारचे सर्वसमावेशक स्वरूप राजकीय पक्षाला घेतल्यावाचून या देशाचे नेतृत्व करता येत नाही. सबंध देश बरोबर घेऊन जाता येत नाही. पक्ष सेक्टेरियन बनतात म्हणून या देशामध्ये एक ऐतिहासिक गरज अशी होती की, त्याच्यामुळे द्विपक्षपध्दती सुरू झाली नाही. अनेक पक्ष असून बहुपक्ष पध्दतीही रूजली नाही. तर प्रत्यक्षात बहुविध पक्ष असले तरी काही मधली वर्षे सोडली तर एकाच राजकीय

पक्षाची सत्ता तीस-चाळीस वर्षे राहिली. त्याला भारतीय राजकारणाचे अभ्यासक एक प्रबळ पक्षपध्दती म्हणतात. One Dominant Party System या डॉमिनंट पार्टीसिस्टिममुळे स्पर्धेची पण हमी मिळाली आणि त्या स्पर्धेच्या परिणामी होणारा सत्ता बदलही टाळता आला. एकाच पक्षाचे राज्य आणि स्थिरराज्य जे देशाच्या प्रगतीसाठी आवश्यक होते ते ही या देशाला मिळाले. त्या प्रबळ पक्षाने हुकूमशाही प्रवृत्ती धरू नयेत याकरिता आवश्यक असलेली स्पर्धादेखील काँग्रेसअंतर्गत आणि काँग्रेसबाहेर अशी सर्वत्र आपल्याला दिसून आली. ज्यावेळी काँग्रेसची अंतर्गत स्पर्धा बंद झाली त्यावेळेला सगळ्या अडचणी सुरू झाल्या. अंतर्गत लोकशाही संपली, अंतर्गत निवडणूका संपल्या, अंतर्गत दुसरे नेतृत्त्व उभे करण्याची प्रक्रिया संपली. उरली एक व्यक्ती आणि पक्ष म्हणजे एक प्रचंड मोठा रबर स्टँप. घटना नाही, निवडणुका नाही, कोणाला घ्यायचे ते त्या व्यक्तीने ठरवायचे. कोणाला हाकलून द्यायचे ते त्या व्यक्तीने ठरवायचे. हा जो सगळा प्रकार सुरू झाला त्याने तो पक्ष मोडीत निघाल्यासारखा झाला.

तेव्हा या देशामध्ये द्विपक्षपध्दती या पुढच्या काळात कधीतरी येईल याविषयी मला मुळीच आशा नाही. आणि तशी ती आली नाही म्हणून मी चिंताग्रस्तही नाही. जोपर्यंत हा समाज बहुविध आहे तोपर्यंत या देशामध्ये बहुपक्षपध्दतीच राहणार. पण बहुपक्ष पध्दती राहिली म्हणजे पक्षानी आज ते जसे वागताहेत तसेच वागले पाहिजे असे मात्र मुळीच नाही. प्राध्यापक लास्की म्हणायचे की, "लोकशाहीमध्ये मतभेद असावेच लागतात. पण कोणत्या प्रश्नावर मतभेद करायचे आणि ते किती ताणायचे याचे संबंधी एकमत असावे लागते." प्रत्येक प्रश्न हा शेंडी तुटो की पारंबी तुटो असा ताणायचा नसतो याचा विवेक आणि संयम लोकशाहीमधल्या पक्षांनी ठेवायचा असतो. काही प्रश्न पक्षीय स्पर्धेबाहेर काढायचे असतात. सबंध

राष्ट्राच्या चिंतेचे ते विषय असतात. प्रत्येकाचा हातभार ते सोडविण्याकरिता आवश्यक असतो. गंमत बघा, जनता दलाच्या शंभर दिवसामध्ये हे त्याच्या लक्षात आले की, काही प्रश्न पक्षीय नसतात, राष्ट्रीय असतात. ते विरोधी पक्षात बसत होते तोपर्यंत कुठलाच प्रश्न राष्ट्रीय आहे असे मानायला तयार नव्हते. आता त्यांनाही राज्य संस्था चालविण्याची जबाबदारी आल्याबरोबर सगळे प्रश्न हे पक्षीय मतभेदांचे करून चालत नाही तर शासनकर्ता पक्ष व विरोधी पक्ष यांच्यामध्ये मतैक्य शोधण्याची प्रक्रिया चालू ठेवावी लागते हे पटले. म्हणजेच लास्की म्हणाले त्याप्रमाणे कोणत्या मुद्यावर मतभेद होऊ द्यायचा आणि तो किती ताणायचा या मूलभूत गोष्टीसंबंधी मतैक्य असल्याशिवाय लोकशाही राहत नाही, ती बजबजपुरी होते. म्हणून आपल्या पक्षपध्दतीत एक पक्ष आहे की दोन पक्ष आहेत की दहा पक्ष आहेत याच्यापेक्षा ते पक्ष कोणत्या भूमिका स्वीकारतात आणि परस्परांबद्दल वागण्याची पथ्ये पाळतात याला खरे महत्व आहे. कदाचित, घटनाकारांना असे वाटले असेल की सुरवातीच्या काही काळानंतर तरी हे शहाणपण राजकीय पक्षांना येईल आणि आपणहून ते स्वतःच्या वर्तनावर काहीतरी बंधन घालून गुण्यागोविंदाने एकमेकांशी स्पर्धा करायला आणि जरूर तेथे सहकार्य करायला तयार होतील. पण आपले राजकीय पक्ष थोडेच गुण्यागोविंदाने आणि विवेकनिष्ठ वर्तन स्वीकारायला तयार होणार ? त्यामुळे मी आता या निष्कर्षावरती आलेलो आहे की राजकीय पक्ष स्वेच्छेने आपली सुधारणा करून घेतील अशी आशा नष्ट झाल्या कारणाने कायद्याने हे काम आता करावे लागणार आहे.

प्रत्येक राजकीय पक्षाला आपली घटना बनवावीच लागेल. ती घटना निवडणूक आयोगाकडे द्यावी लागेल. त्या घटनेप्रमाणे अंतर्गत निवडणुका

कराव्या लागतील. सभासद नोंदणी करावी लागेल. आपल्या आयव्ययाचे हिशोब ऑडिट करून घ्यावे लागतील. ते इलेक्शन कमिशनकडे आणि लोकांच्या माहितीसाठी प्रसिध्द करावे लागतील. इतकी सगळी शिस्त ही शेवटी आपल्याला कायदा करून आणावी लागणार आहे. आपल्या घटनेमध्ये राजकीय पक्षांचे अस्तित्व अध्याहृत आहे. शब्द वापरला नसला तरी त्यावाचून पार्लमेंटरी संसदीय पध्दती निर्माणच करता येत नाही. म्हणून जे अध्याहृत आहे ते स्पष्ट करा आणि त्याप्रमाणे पक्षशिस्तीचा एक आराखडा तयार करून द्या आणि त्याच्याप्रमाणे राजकीय पक्षांना आपली संघटना उभारू द्या. आपल्या निवडणूका घडवून आणू द्या. आणि मग निवडणूक प्रक्रियेमध्ये काय काय सुधारणा हव्यात ते त्यांना सांगू द्यात. आज सगळे राजकीय पक्ष अगदी मोठ्यात मोठा आवाज काढून निवडणूक सुधारणा झाली पाहिजे म्हणतात. पण आपले घर प्रथम सुधारायला हवे आहे. याबद्दल कुणी बोलत नाही आणि शेवटी निवडणूक प्रक्रिया कितीही आदर्श केली तरी ती पक्षांच्या मार्फतच राबविली जाणार असल्याकारणाने इतर देशांचा अनुभव लक्षात घेऊन आणि आपली विशिष्ट परिस्थिती लक्षात घेऊन जे काही बदल करावे लागतील ते बदल जरूर करा. परंतु त्या बदलानंतर एक अधिक निर्दोष अशी पक्षपध्दती आणि निर्दोष अशी निवडणूक पध्दतीही या ठिकाणी शक्य तितक्या लवकर आणली नाही तर लोकांचा निवडणूक प्रक्रियेवरचा विश्वास जो जो डळमळीत व्हावयाला लागलेला आहे, तो नाहीसा व्हायला वेळ लागणार नाही.

म्हणून पक्ष सुदृढ असावेत, निरोगी असावेत आणि निवडणूक प्रक्रिया व निवडणूक कायदा हे सगळे निर्दोष असावेत या दृष्टीने प्रयत्न करण्याची आत्यंतिक गरज आहे. कारण लोकांच्या सहभागाचा तर लोंढा

येत चालल्राय आणि ही चांगली गोष्ट आहे. भारतामधली लोकशाही चाळीस वर्षे टिकली आहे. याचे एक महत्वाचे कारण की, इतर आशियायी आणि आफ्रिकी देशातील लोकांनी बहुसंख्य जनतेला जसे राजकारणापासून दूर ठेवले तसे भारताने केले नाही. भारताने मात्र घटना बनवितांनाच एकवीस वर्षावरच्या स्त्री-पुरुषांना मतदानाचा हक्क देऊन त्या सगळ्या समाजाला राजकीय प्रक्रियेच्या मूळ प्रवाहामध्ये आणून सोडले. त्याच्यामुळे भारतीय लोकशाही अजून पर्यंत टिकलेली आहे. आणि बरीच सुदृढ आहे. मला काही वेळेला लोक असा प्रश्न विचारतात की, आपले लोक जर अशिक्षित आहेत तर आपण मतदानाचा हक्क सुशिक्षितांपुरता मर्यादित ठेवला असता तर आपली लोकशाही अधिक चांगली झाली असती की नाही ? मी त्यांना म्हणतो की लोकशाही चाळीस वर्षे टिकलीच नसती. या देशातील सुशिक्षितांनी लोकशाही चाळीस वर्षे शाबूत ठेवली असती ? शक्यच नाही. मग काय झाले असते ? नवी हुकूमशाही आली असती ? मुळीच नाही. उजव्या हुकूमशाहीचा धोका सुशिक्षितांच्यावर आधारलेल्या लोकशाहीत या देशात सर्वात जास्त आहे. सामान्य निरक्षर म्हणून ज्यांची संभावना केली जाते त्या निरक्षरांनी वाढते राजकीय शहाणपण दाखवून अजून पर्यंत लोकशाही टिकवून ठेवलेली आहे. पण त्याचाच विश्वास ढळायला लागलाय पैशाच्या थैल्या मोकळ्या होत आहेत त्यामुळे गुन्हेगारी जगातले लोक उजळ माथ्याने राजकारणात वावरू लागले आहेत. त्यांना प्रतिष्ठाही मिळते आहे. असे लोक आता आमदार आणि खासदार होऊ लागलेले आहेत. किंबहुना मंत्रीदेखील होऊ लागले आहेत. राजकारणाचे जे हे गुन्हेगारीकरण होते आहे आणि राजकारणामध्ये काळ्या पैशाचा जो प्रचंड उपयोग होत आहे त्याच्यामुळे मतदानाच्या प्रक्रियेंत दोष निर्माण झालेले आहेत. त्याला कीड लागण्याची वेळ आलेली आहे. आणि सामान्य माणसाने जर एकदा मतदानावरचा

विश्वास गमावला तर मग लोकशाही तारणारे या देशात कोणी नाही, आता तर मताच्या हक्कासाठी आपण एकवीस वर्षाहून अठरा वर्षावर आलो आहोत. अठरा वर्षावरती आल्या कारणाने तर आपल्याला आणखीच काळजी घ्यायला हवी आहे. यासाठी निवडणूक प्रक्रिया आणि त्याला पायाभूत असलेला निवडणूक कायदा लोकशाहीचा आधार म्हणून जी पक्षपध्दती आहे त्यांच्यामध्ये फार लवकर सुधारणा करावी लागणार आहे. सॅम्युअल हंटिंग्टन नावाच्या राज्यशास्त्रज्ञाने याचे एक गणितच मांडले आहे. ते म्हणतात की, राजकीय स्थैर्य किंवा राजकीय अराजक, गोंधळ हे कशावरती अवलंबून असतात ? तर एकीकडे लोकांचा सहभाग आणि दुसरीकडे राजकीय संस्थाचे विणलेले जाळे, याच्या परस्पर संबंधाचे जे समीकरण मिळते त्या समीकरणाचे उत्तर, एक असेल तर तो समाज स्थिर असतो. एकाहून अधिक उत्तर आले तर त्याचा अर्थ सहभागापेक्षा संस्थाकरण जास्त झाले आणि म्हणून एकाधिकारशाहीकडे त्या समाजाचा प्रवास चाललेला आहे. आणि एकापेक्षा कमी उत्तर आले तर अराजकाच्या दिशेने समाज चाललेला आहे म्हणून स्थिर राजकारण स्थिर लोकशाही यांच्यासाठी लोकांचा वाढता सहभाग आणि त्याचबरोबर त्याला अनुरूप आणि त्या सहभागाच्या लोंढ्याला व्यवस्थित वळण देणाऱ्या अशा राजकीय संस्थांची लवचिकता याचा आपल्याला समतोल गाठणे हे अत्यंत आवश्यक आहे.

आपण भारताच्या ज्या विविधतेचा उल्लेख बऱ्याच वेळेला राष्ट्रैक्यात अडथळा आणणाऱ्या गोष्टी म्हणून करतो त्याचाच आपल्याला सध्या संरक्षक फळी म्हणून उपयोग होतो आहे. भारतामधल्या ज्या फुटिरवादी शक्ती आहेत असे आपण म्हणतो त्यांचाच उपयोग सध्या तरी आपल्याला एक राष्ट्र म्हणून टिकण्यासाठी होतो आहे. कसे काय ? तर कोणत्याही

एका प्रश्नावरती उभे राहिलेले आंदोलन आणि त्यात होणारी हिंसा ही देशाच्या विविक्षित भागापुरती मर्यादित राहते आहे. सरकारच्या शहाणपणामुळे नाही. किंवा पक्षाच्या संयमामुळे नाही. तर हे जे सामजिक बांध घातले गेले आहेत ना भाषेचे, धर्माचे, जातीचे, प्रदेशाचे. त्यामुळे सगळ्या प्रकारचे बांध घातले गेले असल्या कारणाने एका भागामध्ये जरी भरपूर पाणी झाले तरी ते आपोआप दुसऱ्या भागात वाहून सगळीकडे पाणीच पाणी होत नाही. आणि मग सरकारला हस्तक्षेप करून तिथल्या पाण्याचा निचरा करण्याएवढी सवड आणि वेळ मिळतोय. एखाद्या साथीच्या रोगाच्या प्रदेशामधून प्रवासी आला की, त्याला इतर लोकांच्यामध्ये लगेच मिसळू देत नाहीत. त्याला इतरांपासून वेगळा ठेवतात. तोपर्यंत त्याच्यावर ट्रिटमेंट करायला अवधी राहावा यासाठी त्याला क्वॉरंटाईन करतात म्हणजे बाजूला काढतात. तसे आपल्या सामाजिक परिस्थितीमध्ये क्वॉरंटाईनची सोय झालेली आहे. पंजाबमध्ये उठाव झाला तरी तो ताबडतोब खाली पोहोचत नाही. बंगालमध्ये उठाव झाला किंवा कम्युनिष्टांचे राज्य आले तर ताबडतोब सगळीकडे येत नाही. काश्मिरमध्ये काही झाले तरी इतरत्र होत नाही. राजस्थानमध्ये सतीच्या प्रकरणावरून केवढीतरी हिंसा, अराजकता झाली पण इतरत्र काही झाले नाही. बाबरी मशिदीच्या प्रश्नावरून उत्तर हिंदुस्थान आणि पश्चिम हिंदुस्थानमधल्या काही भागामध्ये केवढा प्रचंड परिणाम झाला. तो आपल्याला निवडणुकीत दिसून आला. पण दक्षिण भारत त्याच्यापासून दूर राहिला.

एका परीने असे आसेतू हिमाचल एक मानस नसणे हे राष्ट्रैक्याच्या दृष्टीने चांगले नाही. हे मान्य करीत असतानाच मी आपल्या नजरेला आणतोय की असे ते नाही. म्हणूनच हिंसा, उद्रेक हे लोकलाईज होताहेत. स्थानिक मर्यादेत पडताहेत. आणि तिथून ते अधिक वाढण्यापूर्वी सरकारला

काही तरी इलाज योजून आग विझवता येत आहे. परंतु असे किती काळ राहणार आहे ? ही क्वॉरंटाईनची एक ऐतिहासिक सोय समाजरचनेमध्ये मिळालेली आहे. ती फार काळ टिकू शकणार नाही. दळणवळणाची साधने झपाट्याने वाढत आहेत. दूरदर्शन खेडोपाडी पोहोचलेला आहे. वर्तमानपत्राचा प्रसार जास्त वाढतो आहे. शिक्षण खेड्यापाड्यापर्यंत जात आहे. सर्व तऱ्हेच्या प्रसार माध्यमांच्या प्रसारामुळे एका ठिकाणची बातमी दुसऱ्याकडे पोहोचायला फार वेळ लागत नाही. आणि त्याच्यामधून अपरिहार्यपणे एक मानस तयार होणार आहे. असे एक मानस तयार होणे हे इष्ट आहे. कारण त्याच्यातच राष्ट्रैक्याची खरी हमी आहे. आजची परिस्थिती ही काही त्यादृष्टीने आदर्श किंवा इष्ट म्हणता येणार नाही. पण ऐतिहासिक क्रमामध्ये मिळालेली सध्याची ही परिस्थिती आहे. त्याचा फायदा सरकार आज घेत आहे. पण याचा अर्थ प्रत्येक प्रश्नावरती काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि गुजराथपासून आसामपर्यंत एकाच प्रकारचा विचार माणसे करतील असे नव्हे. पण ते राष्ट्रहिताच्या प्रश्नांना अग्रक्रम देतील आणि स्थानिक मतभेदाच्या मुद्यांना गौणत्व देतील. जिथे भांडायचे असेल तिथे लोकशाही आणि शांततेच्या पध्दतीने भांडतील. आणि तणाव तुटेपर्यंत ताणणार नाहीत. एवढा विवेक सामान्यजनापर्यंत पोहोचण्यासाठी आपणा सर्वांनाच प्रयत्न करावे लागणार आहेत. या प्रयत्नाचा भाग म्हणूनच भारतीय राजकारणाचे यथार्थ ज्ञान होण्याची आवश्यकता आहे. वर्तमानपत्रामधून मिळणारे जे ज्ञान आहे ते वरकरणी आहे. त्याच्या खोलात जाऊन त्यामागचे शाश्वत प्रवाह आणि समाज आणि राजकारण याचे शंभर ठिकाणी जोडले जाणारे सांधे हे आपण तपासून पाहण्याची गरज आहे. शेवटी लोकशाही समाजाच्या भवितव्याची हमी लोकांच्या सूज्ञतेत असते. लोक जेवढे अधिक सूज्ञ बनतील तेवढ्या प्रमाणामध्ये लोकशाही सूज्ञ, प्रगल्भ आणि म्हणून शाश्वत, टिकावू अशी

राहणार आहे. यासाठी राजकारणाचा गंभीर अभ्यास करण्याची शास्त्रीय अभ्यास करण्याची, मूळात जाऊन अभ्यास करण्याची संवय समाजाला लागण्याची गरज आहे. महाविद्यालयामध्ये राज्यशास्त्र हा खास अभ्यासाचा विषय घेण्यापुरता मर्यादित राहू नये. सबंध समाजाला जी प्रगल्भता येईल तीच आपल्या लोकशाही भवितव्याची खरी हमी असेल.

✿✿✿



# नगरपालिका नगरवाचनालय, कऱ्हाडच्या
# ' यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाले ' ची
# आजपर्यंतची वाटचाल

( साल, वर्ष, विषय आणि व्याख्याते असा या सूचीचा क्रम आहे )

❖ १९७३ वर्ष १ ले

राजकारण आणि समाजजीवन

**प्राचार्य देवदत्त दाभोळकर, पुणे**

भारतीय समाजवाद : काही विचार

**डॉ. मा. पं. मंगुडकर, पुणे**

भारतीय समाजवाद आणि ऐहिक निष्ठा

**प्रा. गं. बा. सरदार, पुणे**

❖ १९७४ वर्ष २ रे

भारतीय लोकशाही : काही विचार

**प्रा. ए. एम. खान, पुणे**

लोकशाही समाजवाद

**वि. अ. नाईक, पुणे**

अविकसित समाजवादाचे स्वरूप

**सदाशिव बागाईतकर, पुणे**

❖ १९७५ वर्ष ३ रे

आजची आर्थिक परिस्थिती व त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग

**डॉ. भा. शं. भणगे, मुंबई**

समाज सुधारणेच्या समस्या

**त्र्यं. कृ. टोपे, मुंबई**

सद्यःस्थिती

**डॉ. प्र. चिं. शेजवलकर, पुणे**

❖ १९७६ वर्ष ४ थे

भारतीय समाजवादाच्या परिवर्तनाची दिशा आणि वेग ( दोन व्याख्याने )

**गोपाळराव मयेकर, गोवा.**

राजर्षि छत्रपती शाहू आणि नवभारताची मागणी

**पद्मभूषण धनंजय कीर, मुंबई**

❖ १९७८ वर्ष ६ वे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक क्रांती

**डॉ. भालचंद्र फडके, पुणे.**

❖ १९७९ वर्ष ७ वे

महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे टप्पे ( दोन व्याख्याने )

**आमदार पी. बी. साळुंखे, कोल्हापूर**

भारतीय राज्यघटना आणि सामाजिक परिवर्तन

**डॉ. सत्यरंजन साठे, पुणे.**

❖ १९८० वर्ष ८ वे

महाराष्ट्रातील राजकारण व समाजकारण कालचे, आजचे व उद्याचे
( दोन व्याख्याने )

**डॉ. जनार्दन वाघमारे, लातूर**

शेतीचे अर्थशास्त्र व त्यातील दुग्ध व्यवसायाचे स्थान

**खासदार प्रतापराव भोसले, भुईंज**

○ १९८१ वर्ष ९ वे

विज्ञान आणि मानवी मूल्ये
( तीन व्याख्याने )

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई**

○ १९८२ वर्ष १० वे

महाराष्ट्र धर्माची नवी व्याख्या
( दोन व्याख्याने )

**नानासाहेब गोरे, पुणे**

○ १९८३ वर्ष ११ वे

**बॅ. पी. जी. पाटील, सातारा.**

तात्यासो कोरे, वारणानगर.

**सौ. शांताबाई किर्लोस्कर, पुणे**

( जमावबंदी आदेश जारी झालेने ही व्याख्याने झाली नाहीत. )

○ १९८४ वर्ष १२ वे

कार्ल मार्क्स - जीवन - विचार आणि समाजशास्त्र ( तीन व्याख्याने )

**वसंत पळशीकर, मंचर.**

○ १९८५ वर्ष १३ वे

डॉ. पंजाबराव जाधव, पुणे.

द्वा. भ. कर्णिक, मुंबई.

( रशियाचे राष्ट्राध्यक्षांचे निधनामुळे ही व्याख्याने झाली नाहीत. )

❖ १९८६ वर्ष १४ वे

१) यशवंतराव चव्हाण आणि महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तन,
२) यशवंतराव चव्हाण : काँग्रेस संस्कृतीचे उपासक व प्रवक्ते
३) दिल्ली दरबारातील यशापशाची मीमांसा ( तीन व्याख्याने )

**द्वा. भ. कर्णिक, मुंबई.**

○ १९८७ वर्ष १५ वे

धर्म आणि इतिहास लेखन
( दोन व्याख्याने )

**डॉ. रावसाहेब कसबे, संगमनेर.**

**○ १९८८ वर्ष १६ वे**

भारतीय बहुजन समाजाच्या प्रगतीची वाटचाल ( दोन व्याख्याने )

**ॲड. डॉ. पंजाबराव जाधव, पुणे**

**❖ १९८९ वर्ष १७ वे**

महात्मा फुले : सामाजिक विचार आणि आजचे सामाजिक संदर्भ ( दोन व्याख्याने )

**प्रा. बा. ह. कल्याणकर, औरंगाबाद.**

**❖ १९९० वर्ष १८ वे**

भारतीय राजकारण : अभ्यासाची एक दिशा ( दोन व्याख्याने )

**डॉ. राम जोशी, मुंबई.**

**○ १९९१ वर्ष १९ वे**

सामाजिक न्याय व सामाजिक परिवर्तन ( दोन व्याख्याने )

**प्रा. मे. पुं. रेगे, मुंबई.**

**❖ १९९२ वर्ष २० वे**

आपल्या विकासाची दिशा आणि लोकशाहीचे भवितव्य ( तीन व्याख्याने )

**डॉ. भा. ल. भोळे, नागपूर.**

**○ १९९३ वर्ष २१ वे**

समाजवादाची फलश्रुती ( दोन व्याख्याने )

**प्रा. श्रीनिवास बिष्णू खांदेवाले, नागपूर.**

---

○ अशी दर्शविलेली व्याख्यानांची पुस्तके प्रकाशित झालेली नाहीत.

---

# ' यशवंतराव चव्हाण स्मृती सदन '



कराड नगरपालिकेच्या साहित्य - नाट्य - कला केंद्राची वास्तु